म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय काव्य वा.
दा. क्र. ११३५२

दा. क्र. ११९५२

इ.सं. १९६७.

# दांव्या टेव्या

IRBK-0111952
IRBK-0111952

म. ग्रं. सं. ठाणें
विषय
ग्रा. नं. २०२

म. ग्रं. सं. ठाणें
विषय बालवाङ्मय



० किमत १२ आणे

११९५२ म.ग्रं.सं.ठाणे.
२११९५२

# शंब्या लंब्या

११९५२

**जग्या गोखलेचें** आणि शंब्यांचें भांडण आंता अगदीं हात घाईवर आलें होतें. आणि भांडणाचें कारणही कांहीं किरकोळ नव्हतें. शाळा सुटल्यानंतर घराकडे परत येतांना........

"जग्या तुला गणितांत रे किती मार्क मिळालें ?"

"साडे नऊ" जग्या शंब्याला उत्तरला.

"तू गाढव आहेस" शंब्यानें शेरा मारला.

"असेन" जग्या म्हणाला.

"असेन नाहीं, आहेसच."

IRBK-0111952

"मग तुझें काय म्हणणें आहे!" जग्यानें चिडून विचारलें.

"म्हणणें दुसरें तिसरें काय असणार ! तुला असें कमी मार्क मिळायला लागले........तूं असा अभ्यासांत मागें राहिलास तर आमचें कसें व्हायचें? तुझा पेपर पाहून तर आम्ही लिहिणार, आणि त्या तुलाच जर ९।–९॥ मार्क मिळालें तर रें आमचें कसें व्हावयाचें? आज ढब्बे मास्तर मला काय म्हणालें ठाऊक आहे ?"

"काय म्हणालें" जगूनें आस्थेनें विचारलें. त्यावर शंब्या शिष्ट-पणाचा अविर्भाव करित म्हणाला.

"ढब्बे मास्तर एका बाजूला नेऊन मला म्हणालें. शंब्या बारा पावसाळ्यांत तूं भिजलास. मी स्वत: दिलेल्या छड्या मी अदमासानें लक्षांत ठेवल्या आहेत आणि तीही सारी चार वर्षांतील करामत. आजे हजार दिड हजार छडी तुला बसली असेल. तुला मारून फोडलेले वेत शंब्या जर मी एकत्र केलें तर दोन तीन खुर्च्या बनवतां

येतील त्याच्या. पण पालथ्या घड्यावर पाणी; या चार वर्षांत चार शब्द का चार वाक्य तुला सरळ लिहितां आलीं नाहींत. बरं ते एक राहो. पण कॉपी तरी कुणाची करावयाची हीं तरी तुला अक्कल हवी होती. तो जग्या गोखल्या म्हणजे तुझ्याहून बेअक्कल. त्याची तूं कॉपी करूं लागलास म्हणजे तुझ्या गाढवपणाची कमालच झाली. आणि पुढें ते म्हणाले " शंब्या शहाणा असशील तर जग्याची संगत सोड व कॉपीकरतां दुसरा एकादा चांगला मुलगा शोधून काढ. बोला महाशय आतां."

" ढब्बे मास्तर असें कधींच म्हणणार नाहींत."

" अरे तुझ्या गळ्याची शपथ ढब्बे मास्तर असेंच म्हणाले." शंब्या आपला अगडबंब देह घुसळत म्हणाला.

" माझ्या गळ्याची शपथ वाहायला तुला फोपशाला काय होतें, मेलो तर हा जग्या मरणार, मोटारचें ' टायर ' थोडेंच पंक्चर होणार आहे ! "

चिडल्यामुळें शंब्याचें तोंड इब्राहीम गारद्यासारखें झालें होते. त्याच्या हातांत असलेली फूटपट्टी शिवाजीनें भवानी तलवार हलवली असेल तशी तो हलवीत होता. टोपीबाहेर आलेल्या शेंडीची त्याला जाणीवही नव्हती.

" टायर...नी फोफशा कुणाला रे म्हणतोस ? टायरही महाग झालय मिस्टर. तुझ्यासारखी धुणं वाळत घालावयाची काठी असण्यापेक्षां फोफशे असणेंच फार बरें. ढब्बे मास्तर सुद्धां म्हणाले शंब्या! जग्यासारखें हडकुळें असण्यापेक्षां तुझ्यासारखा गोलघुमट असलेले, पुरवले. ढब्बे मास्तर म्हणाले शंब्या पाहिजे तेवढा आकार वाढव, वेळ आली तर शाळेचे दरवाजे फोडून मोठे करूं पण तुला आंत घेऊं."

C11. 311. 9)

ढब्बे मास्तरना नाहीं कांहीं कळत." जग्या म्हणाला.

"जय हिंद !" हा शब्द मागें घे. जग्या ढब्बे मास्तरांचा अपमान तो माझा अपमान. जय हिंद, आणि त्यांचा अपमान तो शाळेचा अपमान. जय हिंद. शब्द मागें घे जयहिंद."

"हें 'जय हिंद' कशाला मधें मधें. हंऽऽम्हणें जय हिंद, इथें काय काम जय हिंदचें"

"जय हिंद, मध्यें बोलतांना म्हटलें म्हणजे जोर येतो. जग्या तुला कांहीं अक्कल नाहीं. जय हिंद म्हणून साधा गुद्दा मारला तर शत्रु जमीनी सपाट होतो. भांडतांना जय हिंदचा उपयोग विशेष. पण हें तुला गाढवासारखें काय सांगतोय. सध्यां तूं जपान असून मी अमेरीका आहे. जय हिंदचा अणू बॉंब मी तुझ्या हातांत देणें म्हणजे निव्वळ मूर्खपणा होय. बर ते, जाऊं दे, ढब्बे मास्तरांची माफी माग. जय हिंद, शब्द परत घे "जय हिंद."

"जय हिंद, शब्द परत घेत नाहीं जय हिंद."

"अरेच्या ! आमचेंच हत्यार आमचेवर !"

"जय हिंद शब्द परत घेत नाहीं "जय हिंद"

शंब्यानें आपल्या हाताच्या बाह्या वर सारल्या त्या रेशनच्या पिशवीएवढ्या मोठ्या दिसत होत्या.

"होते कां ?"

"जय हिंद, होते म्हणजे....होणारच, जय हिंद."

अशी 'काठी' व 'टायरची' हाणामारी सुरू झाली.

परंतु ती फार वेळ चालली नाहीं. स्थळ, काळ, वेळ या दृष्टीनें ती लवकर संपणेंच इष्ट होतें. पण त्या थोड्या वेळांतसुद्धां मारामारींच्या कांहीं थोड्या फार खाणा खुणा या दोघांना झाल्याच. जग्याची

पाटी फुटली, तर शंब्याच्या भूगोलाच्या पुस्तकाचा निकाल लागला. दोनचार ठिकाणीं दोघांनाही खरचटलें. पण शेवटीं दोघांचा समेट झाला. दोघे जेव्हां एकमेकांपासून दूर झाले तेव्हां रविवारीं सदू रंगाऱ्याकडे एकत्र जमावयाचें त्यांनीं पक्कें केलें.

शंब्याचा धाकटा भाऊ लंब्या. शंब्यापेक्षां १।२ वर्षांनीं लहान. या दोघांचें वडील **गोविंदराव** तिकडे जमशेटपूरला टाटांच्या लोखंडाचे कारखान्यांत मोठ्या हुद्याचे नोकरीवर होते. शिक्षणासाठीं मुलांना पुण्यासच त्यांच्या अजोळीं ठेवलें होतें.

शनिवारांतील एकादा मोठा जुनाट वाडा, व एकादी म्हातारी आजी डोळ्यांसमोर आणली कीं, शंब्या लंब्याची व त्यांच्या पालक प्रकृतिची वाचकांस साधारण कल्पना येईल, शंभ्या, लंब्या नि त्यांची आजी या तिघांशिवाय या परिवारांत चौथें कोणी नव्हतें. शंब्या द्वाड खराच पण आजीचा लाडका होता. शंभ्याच्या मानानें लंब्या पुष्कळच सरळ, परंतु खरें बोलावयाचें म्हणजे तोही आपल्या वडिल भावाचे पावलावर जाऊं लागला होता. शंब्या प्रमाणें लंब्याही खूप बाळसेदार होता. हे बाळ जोड 'गोळे' शनिवारांतील ऊंच सखल राजरस्त्यावरून जाऊं लागले म्हणजे पाहणाऱ्याला शनिवार वाड्याचे दोन बुरुज बाल...सूक्ष्म रूपानें मार्ग क्रमूं लागले आहेत असा भास होई. शरीराप्रमाणें त्यांचें मनही मोठें होतें. गरिब विद्यार्थ्याला ते आपल्या खाऊच्या पैशांतून खूपच वेळां मदत करीत व त्यामुळेंच अनेक दांडगाया, अनेक लढे व झगडे, कैक गैर हजेऱ्या, अनेक बेशिस्त वर्तनं यांचे ते सूत्रधार असूनही मुलांचे व मास्तरांचे ते आवडते होते.

शनिवारांतील त्यांच्या वयाच्या मुलाचा त्यांनीं एक कंपूच केला होता. शंब्या, लंब्या, जग्या, सदू रंगारी हे त्या कंपूचे धिलन,

शहानवाज, सैगल होते. हे सारे बाळ गोपाळ येत्या रविवारीं सदू रंगाऱ्याकडे कां बरें जमणार असतील ?

कुठल्या पानपतावर या फौजा जावयाच्या होत्या ?

कुठलें मोठें राजकारण सदू रंगाऱ्याच्या माजघरांतील झोंपाळ्यावर
१ चर्चिलें जाणार होतें ?

प्रश्न जितका सोपा वाटतोय तितकें त्याचें उत्तर गहनच असणार !

सदू रंगाऱ्याकडे या त्रयीनें जमायचें कारणही तसेंच होते. आज जर हे तेथें न येते तर ते शनिवारांतले स्वाभिमानी शूर विरच नव्हत.

त्याचं असं झालं होतं....नुकताच ७।८ दिवसापूर्वीं गणपति उत्सव होऊन गेला होता. मंगळवारची ही गोष्ट असेल. सालाबादा-प्रमाणें शनिवारांत श्री मोरयाची स्थापना झाली होती. दोन चार दिवस चांगले कार्यक्रम झाल्यानंतर त्या दिवशीं कांहीं विशेष कार्य-क्रम नव्हता म्हणून हा कंपू बुधवारांत भोंड्यांच्या नकला पाहण्यास निघाला. आधींच हे सारे पडले रसिक, त्यांतून उत्तम नकलाकारांच्या नकला, मग काय विचारतां आनंदास पारावार नव्हता. सारेजण लवकर जेऊन जाण्यास अगदीं उत्सुक होते. शेवटीं कांहीं काळा-नंतर हा 'चौफुला' नकलांस जाण्यास निघाला. तेथें जाऊन पाहतात तों त्यांचा प्रतिस्पर्धी बन्या कंपू यांचे आधींच तेथें हजर. त्यांनीं पाहतांच एकमेकांत खालील संभाषणास सुरवात केली. एकः—ए ! ए ! मन्या, तो 'टायर' पाहिलास कां कसा तट्ट फुगून आला आहे, आणि ती बघ दुसरी ट्यूबही आहे त्याचेबरोबर. कसा तट्ट झाला आहे बघ, जर कां एकादा कठिण स्पर्श झाला तर साऱ्या प्रेक्षकांचा बाजा करील जोरांत फुटून. अरे वा हा पंप आणि पान्हाही आहे वाटतं बरोबर. बहुतेक मन्या (सायकल दुकानवाला) तुमचें दुकानच इकडे उठून आलेलं दिसतंय. इतकें होईतों ते यांच्या अगदीं जवळ

आले. एकानें सदूला धक्का देऊन म्हटलें "ए ! इथें काय बसतोस लांब हो, ही रंगाऱ्याची फलटण आहे कां ? जा ! इथें काय टायर ट्यूबला रंग द्यायचाय कां ? जा तिकडे फाटक्या चिंध्यांना रंग देत बस. आणि ए तूरे ! हो बाजूला नुसता फूटबॉल आहे फूटबॉल. हो दूर. आमच्यांत नको बसूं. उगीचच उड्या मारायचास." असें म्हणतांच सदूनें व शंब्यानें त्या दोघांचे गळे धरून एक मस्त ठोसा लगावला. इतक्यांत जग्या, मन्या, बन्या त्यांचे मदतीला धावले. हें प्रकरण आतां फार चिडीला जाणार असें पाहतांच लंब्या मध्यें पडला पण एकानें त्यालाच एक जोराचा चिमकोरा घेतला तेव्हां मात्र जग्या फारच चिडला. एवढा वेळ स्वस्थ होता तो. पण आतां मित्रांचे मदतीस गेल्याविना त्याला राहवेना. त्यानें तर एकाच्या अशी एक जोरांत भडकवून दिली कीं तो एका मोठ्या माणसाचे अंगावर कोलमडलाच. त्याबरोबर एका सद्गृहस्थांनीं एकमेकाला बाजूला केलें व दूर दूर स्वस्थ बसविलें. पण मन्या बन्याची अजून पुरी जिरली नसल्यानें ते शंब्या व लंब्याची कुठें शेंडीच ओढ, पाठीमागें गाठच मार अशा खोड्या करूं लागले. आतां पुन्हा येथें खडाजंगी उडणार असें दिसतांच जग्यानें समंजसपणा पत्करून त्या त्रिकुटासह काढतां पाय घेतला ते जात आहेत असें पाहून बन्या म्हणतो कशी जिरली ? छान जिरली. पळपुटे लेकाचे !

ह्याच कार्यक्रमाबद्दलची ती सभा होती. प्रथम जगू म्हणाला कायरे सद्या तुला परवा उगीचच मार खावा लागला नाहीरे ?

सदू:—अरे माराचं कांहीं नाहीरे; पण, एवढ्यां लोकांत आपली फजीती झालीरे, तेथें आमचे काका, शंब्याचे मामा, आपले ढब्बू फब्बू मास्तर यांच्या देखत फजीती झालीरे, याचं मला फार फार वाईट वाटतं.

**शंड्या**:—अरे, मग असा मारलं, मारलं म्हणून ओरडत काय बसलास. अरे आतां याच्यावर कोणाला कांहीं मस्त युक्ति सुचते का पाहूं या पण युक्ति मात्र अशी पाहिजे कीं एकेकाला अगदीं देमाय धरणी ठाय झालें पाहिजे.

**लंड्या**:—मी मी सांगतों; आपण शाळेंत मधल्या सुटींत एकाकाची दप्तरेंच लपवून ठेवूं या. बस, बस ठरलेंच.

**जग्या**:—छे असें नको, शत्रूला शिवाजीप्रमाणें गनिमी काव्यानेंच जिंकले पाहिजे. तर आतां असें करूंया, उद्यां आहे महिनाअखेरची सुट्टी. तेव्हां बन्या कंपूला बोलावूं खेळायला व तेव्हां रस्सीखेच, अंधळी कोशींबीर, लंपडाव वगैरे खेळ खेळायचे व आपण लपायचें सद्या तुमच्या आंब्याच्या बागेंत. व ते शोधायला आलें कीं न विचारतां बागेंत आले म्हणून माळ्याकडून त्यांना द्यायचा छानपैकी चोप.

**सद्या**:—हं ! ते असे नाहीं फसायचे तेव्हां निराळीच गंमत करूंया.

**शंड्या**:—अरे कायरे ? काय काय ? सांग झटकून.

**सद्या**:—ऐक. अरे आपण असें करूंया कीं सर्वांनीं थोडी थोडी वर्गणी काढूंया व त्यांत शंड्या तुझा वाढदिवस मानून सर्व शत्रु पक्षीयांना फराळास बोलावूं व मग करूं त्यांची मजा."

**लंड्या**:—पण अरे वर्गणी किती व त्यांत काय काय करायंच.

**जग्या**:—अरे हो हो ! आंता आपण सव्वा, सव्वा रु वर्गणी आणूं. सद्या ! भारी नाहींनारे ?

**तिघे**:—नाहीं व मग आचारी आणून झकास बेत करावयाचा

आले. एकानें सदूला धक्का देऊन म्हटलें " ए ! इथें काय बसतोस लांब हो, ही रंगाऱ्याची फलटण आहे कां ? जा ! इथें काय टायर ट्यूबला रंग द्यायचाय कां ? जा तिकडे फाटक्या चिंध्यांना रंग देत बस. आणि ए तूरे ! हो बाजूला नुसता फूटबॉल आहे फूटबॉल. हो दूर. आमच्यांत नको बसूं. उगीचच उड्या मारायचास." असें म्हणतांच सदूनें व शंब्यानें त्या दोघांचे गळे धरून एक मस्त ठोसा लगावला. इतक्यांत जग्या, मन्या, बन्या त्यांचे मदतीला धावले. हें प्रकरण आतां फार चिडीला जाणार असें पाहतांच लंब्या मध्यें पडला पण एकानें त्यालाच एक जोराचा चिमकोरा घेतला तेव्हां मात्र जग्या फारच चिडला. एवढा वेळ स्वस्थ होता तो. पण आतां मित्रांचे मदतीस गेल्याविना त्याला राहवेना. त्यानें तर एकाच्या अशी एक जोरांत भडकवून दिली कीं तो एका मोठ्या माणसाचे अंगावर कोलमडलाच. त्याबरोबर एका सद्गृहस्थांनीं एकमेकाला बाजूला केलें व दूर दूर स्वस्थ बसविलें. पण मन्या बन्याची अजून पुरी जिरली नसल्यानें ते शंब्या व लंब्याची कुठें शेंडीच ओढ, पाठीमागें गाठच मार अशा खोड्या करूं लागले. आतां पुन्हा येथें खडाजंगी उडणार असें दिसतांच जग्यानें समंजसपणा पत्करून त्या त्रिकुटासह काढता पाय घेतला ते जात आहेत असें पाहून बन्या म्हणतो कशी जिरली; छान जिरली. पळपुटे लेकाचे !

ह्याच कार्यक्रमाबद्दलची ती सभा होती. प्रथम जगू म्हणाला कायरे सद्या तुला परवा उगीचच मार खावा लागला नाहीरे ?

सदू:—अरे माराचं कांहीं नाहीरे; पण, एवढ्यां लोकांत आपली फजीती झालीरे, तेथें आमचे काका, शंब्याचे मामा, आपले ढब्बू मास्तर यांच्या देखत फजीती झालीरे, याचं मला फार फार वाईट वाटतं.

**शंक्या**:—अरे, मग असा मारलं, मारलं म्हणून ओरडत काय बसलास. अरे आतां याच्यावर कोणाला कांहीं मस्त युक्ति सुचते का पाहूं या पण युक्ति मात्र अशी पाहिजे कीं एकेकाला अगदीं देमाय धरणी ठाय झालें पाहिजे.

**लंब्या**:—मी मी सांगतों; आपण शाळेंत मधल्या सुटींत एका-काची दप्तरंच लपवून ठेवूं या. बस, बस ठरलेंच.

**जग्या**:—छे असें नको, शत्रूला शिवाजीप्रमाणें गनिमी काव्या-नेंच जिंकले पाहिजे. तर आतां असें करूंया, उद्यां आहे महिना-अखेरची सुट्टी. तेव्हां बन्या कंपूला बोलावूं खेळायला व तेव्हां रस्सी खेंच, अंधळी कोशींबीर, लंपडाव वगैरे खेळ खेळायचे व आपण लपायचें सद्या तुमच्या आंब्याच्या बागेंत. व ते शोधायला आले कीं न विचारतां बागेंत आले म्हणून माळ्याकडून त्यांना द्यायचा छान-पैकी चोप.

**सद्या**:—हं ! ते असे नाहीं फसायचे तेव्हां निराळीच गंमत करूंया.

**शंक्या**:—अरे कायरे ? काय काय ? सांग झटकून.

**सद्या**:—ऐक. अरे आपण असें करूंया कीं सर्वांनीं थोडी थोडी वर्गणी काढूंया व त्यांत शंक्या तुझा वाढदिवस मानून सर्व शत्रू पक्षीयांना फराळास बोलावूं व मग करू त्यांची मजा."

**लंब्या**:—पण अरे वर्गणी किती व त्यांत काय काय करायंच.

**जग्या**:—अरे हो हो ! आंता आपण सव्वा, सव्वा रु वर्गणी आणूं. सद्या ! भारी नाहींनारे ?

**तिघे**:—नाहीं व मग आचारी आणून झकास बेत करावयाचा

व त्यांत कांहीं तरी मजा करून शत्रूला असा चीत करायचा कीं येव. बरं तर आतां तूं व मी जाऊं आचाऱ्याकडे. सद्या व लंब्या तुम्हीं साऱ्यांना आमंत्रण द्या. एकसुद्धां विसरूं नका. बन्या, मन्या, जन्या चट सारे बोलवा व तसेच ढब्बू मास्तरांना पण. इतक्या आरडा ओरडी नंतर त्यांचा एकदाचा एक कार्यक्रम करण्याचं ठरलं. शंब्या नि जग्या कार्यक्रमांत मुख्य भाग आचाऱ्याचा असल्यानें 'येथे आचारी व वाढपी मिळतील अशा पाट्या शोधूं लागले पण जवळ पास एकही पाटी न दिसल्यानें ते सारे कन्या शाळेजवळील एका देवालयांत आले. तेथें कोणी पंचाधारी, तांबटसर हातांचा, लालबुंद डोळ्यांचा, घाणेरड्या वेशाचा असा एक मुख्य मॅनेजर बसला होता. तो जर अशा प्रतीचा तर त्यांचे साथीदार काय विचारतां? काळे काळे कुट्ट. ते व त्यांचे कपडे जणुं कोळशाच्या खाणतिलेच. त्यांना सारा बेत सांगण्यांत आला अर्धा पाऊण तास लागला. शेवटीं शनिवारी शंब्याच्या वाढदिवसाच्या समारंभाला एक गोंद्या नामक आचार्य निश्चित झाले. व त्यांना न विसरतां वेळेवर येण्याचें सांगून तेथून हे दोघे एकदाचें सटकले. त्यांना अगदीं असें झालें होतें कीं केव्हां एकदां येथून, या घाणींतून बाहेर पडूं. या नंतर ही जोडी परत आली. 'अजी ए अजी मेजवानीला ग काय काय करायचं?' शंब्या लाडांत येऊन म्हणाला. मग आजी उत्तरल्या "अरे वर्गणी तरी काय जमली आहे? तें आधीं सांग, मग मी सांगतें किती व कोणते पदार्थ करावयाचे ते" शंब्या म्हणाला, आहे, पांच सव्वा पांच रु. अजीः—बरं! आचाऱ्याला काय ठरलंय! जग्याः—सव्वा रु. आजी—तर मग असं करा एक साधा भात, एक वांगीभात....कारण सध्या वांगी आहेत स्वस्त, आणि करायला सोपा व दिसायला छान आणिक-वांग्यांचें भरीत कांद्याबटाट्याचा रस्सा ही मी देईन करून व नारळाची चटणी टोमॅटोची कोशिंबीर

बस झालें. अरे ! पण तुझा वाढदिवस मानायचा ना मग हा तर साधा बेत झाला मग काय थोडा शिरा नि पोळ्या करतां का ?

**जग्या**—नको आजी भातच करूं साधा [ शंड्या त्याच्या कानाला लागतो व म्हणतो साधा काय वांगी भात म्हणं ] बरं.

**शंड्या**:—काय रे लंड्याला नि सद्याला जाऊन बराच वेळ झाला ते अजून कां बरं आले नाहींत ? बहुतेक त्यांना एकाद्याचं घर सांपडलं नसावं.

**जग्या**:—अरे हो खरंच ते २ वाजतां गेलेतना ? आतां तर ४॥ वाजले. खरोखरी ते यावेळीं यायला हवे. हं मलाही तसंच वाटतं कीं ते घर विसरले असावेत कोणाचं तरी.

[ इतक्यांत सद्या व लंड्या घामाघूम झालेले आंत येतात] लंड्या, ए दादा ! आम्हाला किनई त्या मन्या लेकाचं नि ढब्बू मास्तरांचं घरच सांपडेना अरे खूप खूप शोधलं. पण नाहींच सांपडलं.

**जग्या**:—बघ मी म्हटलंच.

**शंड्या**:—तू कुठलं ? प्रथम मीच म्हटलं. बरं. अरे पण इतरांचीं तर सांपडलीं ना. हो. मग काय काय ते म्हणाले ?

**सद्या**:—अरे सांपडलीं खरी पण.......

**जग्या**:—पण काय ?

**लंड्या**:—अरे कोणी म्हणायला लागलें आपल्याला नाहीं बोवा रविवारीं जमायचं. मन्या म्हणाला मला आमच्या काकांकडे जायचंय फराळाला त्याच वेळीं. आणि कोणी म्हणाले कीं रविवारीं बाबा असतात घरीं ते नाहीं आम्हाला पाठवणार. ते म्हणतात शनिवारीं ध्या वाटेल तेव्हां. पण बन्या म्हणाला कीं कायरे तुमचा आम्हाला मारा शिराचा तर बेत नाहींना. मी त्याला म्हटलें येऊन तर बघ. तेव्हां तो कसा म्हणतो, कीं अरे एकदां तुमच्याकडे आलों तर जीवा-

निशीं परत येण्याची आशाच नको. ‘ अरे शेळी जर लांडग्याच्या कळपांत गेली तर लांडगे काय तिला शिवाजीसारखी परत पाठवणार आहेत थोडीच. तसेच तुम्हीं. तेंव्हां आपण नाहींरे बाबा येणार ! मी त्याला म्हटलें अरे कधिं कधि लांडग्यावरही विश्वास ठेवावा लागतो. सारेच कांहीं चोर नसतात कांहीं **शिवाजी**ही असतात.

आणि ढब्बे मास्तरांच घर मला कांहीं सांपडेना. अरे ! ते व बन्या तर अवश्य पाहिजेत. मास्तर आपले सर्व मुलांचें लीडर व तो शत्रु पक्षाचा लीडर. मोठ्या कार्यक्रमास लिडर तर पहिले हवेंत. बरें तर आतां तुम्ही आजीला सामानाची यादी विचारून तयार ठेवा व तोंवर आम्हीं सर्वांना उद्या दुपारीं शाळा सुटल्यानंतर ११॥ ला फराळास बोलावतों. दुपारची वेळ ठीक आहे. चलरे जग्या. चला. शंभ्या म्हणाला. [ हे दोघे ढब्बे मास्तर व बन्या व सारी मुलें यांना बोलवावयास जातात. ] इकडे हे दोघे आजीला सतावून सतावून भाजीपाला काय आणायचा किती आणायचा याचा अंदाज तयार करून ठेवतात. इतक्यांत हे दोघे आले. मग कुणीं कुणीं मंडईत जायचें व कोणी आचाऱ्याला फेर विचार बेत कळवायचा ह्याचा बराच वाद होऊन शेवटीं शंब्या व सद्यानें मंडईत जावें आणि जग्यानें व लंब्यानें आचाऱ्याकडे जावें असें ठरलें.

[ दुसरा दिवस १०॥ वाजले आहेत, अजून आचार्यांचा पत्ता नाहीं, मुलें एक एक या क्रमानें जमत आहेत जग्याची आचाऱ्याकडे २ री खेप होण्याच्या बेतांत आहे. शंब्या, लंब्या, सद्या आजींना मदत करताहेत. अजी मुलांना भाजी पाला याच्यांत मदत करताहेत. ढब्बे मास्तरांना एकच्याच सुमारास निमंत्रण दिल्यानें ते अजून आलेले नाहींत. या त्रिकुटाचा जीव आचाऱ्यामुळें खालींवर होत आहे. ]

**शंब्या**:—जगू [ जरा चढवून कामापुरता ] जा बाबा जरा त्या आचाऱ्याला पाचारण कर. [ जगू सायकल घेऊन जातो. ]

**सदू**:—-ए बन्या आपण स्वयंपाक होईतों खेळूंया [ सर्वांनुमते लगोरीचा डाव पसंत पडून तो सुरू होतो ] घरांत शंब्या [ भोजनाधिकारी ] असतात. त्यांना फार भूक लागते. तो म्हणतो आजी फार भूक लागली ग ऽऽ तर जरा कॉफी करूं येतेस कां? म्हणजे सर्वांनाच होईल. आजी कॉफी करतात सर्व संपते. शंब्या वाटणार आजी करणार म्हणून ते अधिक घेत नाहींत. इतक्यांत आचार्य गोंदोबा येतात. नमस्ते महाशय जरा लवकर यांव कीं नाहीं. ते म्हणतात काय करावं साहेब........यामुळें उशीर झाला. आजी त्याला ५।६ कप कॉफी फर्मावतात. कॉफीपानानंतर त्याला सारें समजावून देतात. [ वांगीभात व शिरा दोन प्रकारचे सांगतात. १ चांगला—मास्तर मित्र कंपू व आजी अचारी. २ शत्रुपक्ष, खारट, अगोड, तुप वाशेळें. ] १२ वाजतात सारे चुळबुळ करतात पण सदूच्या बागेत जाण्याचें निमित्त करून त्यांना गप्प बसवतात. जगू व लंब्या घरीं राहतात. २॥। ला मास्तर येतात, स्वयंपाक तयार असतो. सदू साऱ्यांना बोलावतो. आजी व लंब्या, मास्तर पानें वगैरे घेऊन जय्यत तयार असतात. सारीं मुलें येतात. मास्तरांना पाहून सारी आनंदतात. जो तो विचारतो सर तुम्हीं केव्हां आला? कसें आलां? असें हजारों प्रश्न विचारून त्यांना सारे सतावून सोडतात. ते म्हणतात अरे आम्ही जातीचे भिक्षूक, आम्हांला का आमंत्रण हवें, लागला शिऱ्याचा वास शिरलो आपले घरांत. झालं. बरं आतां पानावर बसा पाहूं. चलरे जग्या तूही बस. तो नको म्हणतो व शंब्याचा वाढदिवस म्हणून त्याला बसवतो. तो सुद्धां जरा कां कू करतो; पण बसतोच शेवटीं. जग्या व सद्या मुख्य वाढपी व आजी

नि अचारी गौण वाढपी बनतात. प्रथम जेवण सर्व उत्तम असल्यानें व मुलांच्या पानांत मुद्दाम कमी वाढल्यानें ते आधीं संपवतात. इतक्यांत ढब्बे मास्तर नियम काढतात 'पानांत कोणीही कांहींही टाकावयाचें नाहीं, त्याच वेळीं जग्या साऱ्यांना खूप खूप द्वितीय प्रकारचा स्वयंपाक वाढतो. दोघेंही एकदम वाढल्यानें कोणाला कांहीं शंका येत नाहीं पण मग खातांना चव कळते. सारे दोनचार घासांतच छी ! छी ! थूऽऽ थूऽऽ करतात. पण न टाकण्याच्या नियमानें ते अणिक न खातां उठतात. सारे तडफडतात एकेकाला हा बेत फार तापदायक होऊन कट फुटतो. सारे यांच्याशीं खुनशी वृत्तीनें बोलूं पहातात. प्रत्येकजण एकमेकांशी कानांत कुजबुजून यांच्या कटाचे विरुद्ध सूड घेण्याचें ठरवतात. शेवटीं त्यांचे लीडर बन्याबापू हे ढब्बे मास्तरांकडे तक्रार नोंदवतात. ते नीट एकेकाचें ऐकूं पाहतात. तों सारे एकदम गिल्ला करतात. ते शांत शांत करतात पण कोणी ऐकत नाहीं. ढब्बे मास्तर मौन स्वीकारतात. मग बन्या सर्वांना शांत करतो. सारे एक एक याप्रमाणें सारे निवेदन करतात. कोणी म्हणतात सर तें तूप कसलें ह्यऽऽ असलें घाण तूप आम्ही वापरीतच नाहीं पण वेळच आली तर पाय फुटले असतांना त्याला लावतों. रघ्या म्हणतो तो तसला भात आम्ही आमच्या दुभत्या म्हशीला घालतों. अशा एक ना शंभर तक्रारी मुलें करतात. मास्तरांना पटत नाहीं कारण त्यांना 'स्वतंत्र' असतें. ते म्हणाले अरे असें कसें होईल. तुम्ही उगीच कांहीतरी सांगतां. सारी मुलें या चौफूल्याकडे बघून. बरं बरं पाहून घेऊं म्हणतात.

कांहीं थोडे दिवस जातात. एका शनिवारीं एक गुप्त सरकारविरोधि पत्र निघते त्याला बुलेटिन म्हणतात. तें मुलांच्या शाळेंत वाटलें त्या वेळीं वर्ग चालू असून २। वाजले होते. सारीं मुलें

फळ्याकडे अगदीं रोखून पहात होती. मास्तर सर्व मुलांना गृह-पाठांत न आलेलें उदाहरण समजाऊन देत होते. इतक्यांत जिन्यावर धाड ऽ धाड ऽ वाजलें. मुलें कान टवकारून जिन्याकडे पाहूं लागली. पाहतात तों काय एक खादी वेषधारी १०।१२ वर्षांचा मुलगा हातांत कांहीं पत्रकें घेतलेला यांच्या वर्गासमोरून वीज चमकावीं तितक्या झटकन् कांहींतरी फेकून गेला. साऱ्या मुलांना त्यानें काय फेकलें हे पाहण्याची फार उत्कट इच्छा झाली. पण मास्तर अगदीं तन्मयतेनें शिकवीत असल्यानें बाहेर जाण्याची कुण्णा म्हणून कुण्णाची प्राज्ञा नाहीं झाली. सारे अगदीं एक कान व डोळा फळ्याकडे व दुसरा कान अगदीं घंटेकडे लावून बसले होते.

ठण्ण् ठण्ण ठंठंठंठं, घंटा मुक्तकंठानें गर्जून साऱ्यांना मुक्त करिती झाली. ५ वीचे मास्तरांनीं झट्कन् आपलें गणित शिकविण्याचें काम संपवले व मुलांना मुक्त केलें. सारे अगदीं ससाण्यासारखे त्या फेकलेल्या कागदाकडे धावले. तोंच तो कागद वर्गमंत्र्यानें हातीं घेऊन वाचून दाखवला. तो म्हणाला 'ऐका ऐका ! उद्यां रविवारीं स्वातंत्र्यदिनानिमित्त ७ वा. मिरवणूक लकडी पुलावरून निघून ट्रे. कॉ. सदाशिव पेठ हौदावरून सेवासदन; त्यावरून हुजूर पागा ४ नंबर, गोपाळ हायस्कूलवरून निघून फुटक्या बुरुजापाशीं थांबेल व तेथें श्री. गाडगीळ यांचे अध्यक्षतेखालीं सभा भरून नंतर ती विसर्जन पावेल तरी सर्व विद्यार्थ्यांनीं त्यांत मोठ्या जमावानें भाग घ्यावा. वंदेमातरम्.

सारीं मुलें आपले आपले गट करून चाललीं होतीं. ज्याचे त्याचे तोंडीं प्रभातफेरीचाच विषय होता. जो तो एकमेकांस विचारीत होता कायरे तू जाणार का उद्यां? कुणी म्हणे जाऊं दे कोण जातो एवढ्या थंडींत, कुणी म्हणे नकोरे बाबा मला आई नाहीं पाठव-

णार. ती फार भिते, ती मला अगदीं फार फार जपते. कुणी म्हणे अरे गेलो असतो रे पण मी आज १० वाजतां वडिलांबरोबर सिनेमास जाणार आहें. कुणी म्हणे आपण जाणार बाबा मी आजच बाबांना विचारून ठेवतों. त्यांना सांगेन आम्हाला शाळेंत ट्रिपकरतां सकाळीं जमावयाचें आहे. कुणी म्हणे, आपण असें खोटेंबिटे नाहीं बुवा बोलणार.। मी आपला मित्राबरोबर फिरायला जातों म्हणून निघेन व तसाच मिरवणुकींत मिळेन. इतक्यांत शंब्या लंब्या कंपू ठराव करीत येतो उद्यां जाण्याचा. तो बेत बन्या कंपूपैकीं रघ्या हळूंच ऐकतो. त्याला एक युक्ति सुचते. आपला..............बेत तो बन्याबापूंना सांगतो. त्यांना बेत फारच पसंत पडतो. तो म्हणतो जग्या कुठं मग उभें राहूं म्हणतोस.

**रघ्या**:—अरे थांब. आपण ते एकदम मिरवणुकीबरोबरच निघतात कां त्यांच्या घरून निघून वाटेंत कोठें मिरवणुकीस मिळतात तें नको कां कळायला. नाहीं तर साराच घोंटाळा.

**बन्या**:—बरं बरं तर तसं होऊं दे. पण हेर कोणता पाठवा-यचाऽऽ? हंऽ हंऽ आपल्या रंग्याला पाठवूं या. बस् बस्. ठरलें.

**रघ्या**:—पण तो जाईल ना नाहींतर बसेल चोरांकडे अडकून.

**बन्या**:—थांब त्याला बोलावून घेतों. [रंग्याचे घरीं जातो रघू कोणत्या रुपानें त्याला पाठवावा याचा विचार करीत बसतो.] [इतक्यांत बन्या व रंग्या येतात].

**बन्या**:—कायरे याला कसा पाठवायचा?

**रंग्या**:—म्हणजे मी पायीं नाहीं कां जाणार? [लेका तसें नाहीं. तो कांहीं तुला पाय येथेंच काढून ठेव नि जा नाहीं सांगत. कसा म्हणजेऽऽ तेथें गेल्यावर काय व कसें तू बोलावेस असें तो विचारतोय. बरें तूं आतां असें कर. तू शंब्या लंब्याकडे जायच

अभ्यास विचारण्याचं निमित्त करून व तिथें गेल्यावर सहज बोलतां बोलतां त्यांना विचार कीं तुम्ही उद्यां मिरवणुकीस जाणार कां? केव्हां जाणार व कुठून निघणार? अगदीं सारे विचारून यावयाचें कांहीं विसरावयाचें नाहीं. जा. पटकन ये.]

× × ×

रंग्या शंब्याकडे आलेला आहे. शंब्या व लंब्या दोघेंही शोधक भेदक नजरेनें इकडे तिकडे पहात आहेत. इतक्यांत त्यांना रंगोपन्त दिसतात. दोघेंही काय कसं काय रंगोपन्त, कुठें वाट चुकलांत, रंगोपन्तः—चुकलों नाहीं, मुद्दामच आलों आहे. अरे तुला माहीतच आहे, काल माझी मावशी खूप आजारी होती व त्यामुळें मी काल शाळेंत नव्हतो आलों ना म्हणून आपला अभ्यास विचारायला आलों. सांग काल काय काय झालं.[पहिला तास ढब्बे मास्तरांनीं व्याकरण घेतलें, २ रा तास करंदीकर मास्तरांचा भूगोल झाला. ३ तास—काळे मास्तरच नव्हते. ४ मनकवडे मास्तर—मराठी गद्य घेतलं. ५ पोटे-गणित. झाल अभ्यास, पुढचा तास शाळा सुटली].

दोघेंही एकमेकांस (लक्षांत आहे ना? नाहींतर विसरशील.) रंग्या— अरे काय साधें असेल तर सांग मला? काय रे शंब्या अरे कांहीं नाहीं. उद्यां कीं नाहीं आम्ही जाणार आहों मिरवणुकीला—रंग्या— अरे मग मला सांगा—ते सर्व कांहीं नीट समजावून सांगतात ओघा-ओघानें केव्हां नि कसें निघणार हेंही सांगतात. रंग्या—अरे मग मी येईन. मला तुम्ही सदाशिव पेठेच्या तिथें खोकल्यांच्या हॉटेलवर जन्या राहतो ना तेथें भेटा. मग काय येताय मला भेटायला सकाळीं?

हं. हं.

× × ×

बराच वेळ रंग्याची वाट पाहून आतां रघ्या नि बन्या कंटाळले होते. पण त्यांना रंग्या उड्याच मारीत येत असलेला दिसला तेव्हां तो कोठें पळून गेला नाहीं अशी त्यांची खात्री झाली.

**बन्याः**—कायरे इतका उशीर रे कां केलास ?

**रंग्याः**—अरे सर्व माहिती बिनचूक नको कां विचारायल म्हणून गेला एवढा वेळ.

**रघ्याः**—पण काम कसं ? एकदम फत्ते ! रंग्या म्हणाला. बन्या; पण ते कसें निघणार सांग सारें.

**रंग्याः**—ऐक ! प्रथम मी माझें सोंग नीट बजावलें व मग ते दोघे एकमेकांस ' लक्षांत आहे ना ' म्हणाले तेव्हां मी काय म्हणून विचारलें तेव्हां ते म्हणाले, अरे उद्यां आम्हीं ६॥ ला निघूं नि भुंजोबाच्या बोळांत सदूला घेऊन तुला खोखल्यांचे हॉटेलशीं मिळूं.

**रघ्याः**—वा वा छान काम. म्हणजे काय ते आपल्याला जग्याच्या घराशींच भेटतील. छान झालं.

**बन्याः**—बरं रंग्या तूं हे दोन आणे घेऊन काळा नि तांबडा रंग आण व उद्यां ६ लाच ये. मी इतर सर्व तयारी ठेवतों. रंग विसरूं नको हं. आणि रघ्या तूं सर्व कंपूला निमंत्रण द्यायचें बरं कां ? पण उद्यां तू आधी ये, नाहींतर विसरशील. ए ? पण जन्याकडं शेण मिळेल ना ! नाहींतर तू शेजारच्या गाईचं आण. मी खूपसा चिखल तयार ठेवतोय, बस ठरलंच.

शंब्या कंपूनें २।३ काठ्या शोधून ठेवल्याच होत्या. पण आमच्या शंभूरावांची काठी कांहीं सांपडली नव्हती. पण त्यानी सकाळीं असं केलं कीं शेजारच्या रामरावांच्या रेडीओची काठीच उपटून आणली, अशा तऱ्हेनें ते चौघे विरछत्रीच्या दांड्याचा झेंडा, अजोबांच्या छत्रीचा झेंडा, धुण्याच्या काठीचा झेंडा असें विविध

प्रकारचे घरगुति केलेले तिरंगी झेंडे घेऊन हे जयघोष, करीत निघाले. ' महात्मा गांधीकी जय ' ' जवाहीरलाल नेहरू की जय ' ' सुभाषचंद्र बोस की जय ' अशा आरोळ्या देत देत ती छोटीशी पांच पांडवांची मिरवणूक खोखले हॉटेलपाशीं आली. त्यावेळीं ६॥ चा सुमार होता नि ते दिवस हिवाळ्याचे असल्यानें अंधार साधारण होताच. मिरवणूक पुढें जाण्याऐवजीं थांबली कां बरं ? आरोळ्या कां बंद पडल्या आणि हे वर काय पाहताहेत ? आणि हे तांबडे काळे डाग कसले मुलांच्या अंगावर, मारामारी तर नाहीं ना ? नाहीं. काळे डाग मारामारींत कसे येतील ? छे आपण पाहूंच आतां. अरे तो पहा बन्या, आणि तें काय वरून काळेंसें पडत आहे, शेण कीं काय ? शीऽऽशी ! अरे तो पहा जन्या शेण टाकतोय, हें बघ त्याच्या सदऱ्यावर पडलें, आणि तो पहा बग्या, बन्या कसलेंसे पाणी ओततोय. एक दोघे असें बोलत असतात. पुन्हां त्यांना तो सर्व कंपू दिसतो. सारे तो कट मानतात व आपले कपडे बदलण्यास घरीं जातात. त्यांना तो कट होता हें कळतें तेव्हां ते म्हणतात. ' अरेरे कालच जर आपल्याला हें कळतं तर त्या रंग्याला हल्कटाला कांहीं सांगीतलं नसतं. त्याचंच हें काम आहे. अरे लेकांनो, पाहून घेऊं थांबा, पाहून घेऊं, असा कट करतां काय अरे दुष्टांनो !

बरं आतां आपण कपडे बदलूं. उगीचच मिरवणुकींत घाण केली लेकांनी. आमचे कपडे घाण झाले त्याबद्दल आम्हाला कांहीं नाहीं, पण उगीच उशीर. बरं जग्या सद्या तुम्ही परत झट्कन कपडे बदलून या आम्ही तयार राहतों.

**लंब्याः**—अरे पण आपलं काय रे ! हे कपडे कसे आजीला दाखवायचे.

**शंऱ्याः**—आतां असं करूंया कीं घरांत जाऊं मागच्या दारानें, व आजीच्या मागें लावूं लकडा, अंघोळीच्या आधीं उघडेच तिच्या पाशीं जाऊं म्हणजे मग ती म्हणेल इतकी घाई का आहे तर करा तुम्ही अंघोळी मग आपण या कपड्यांना साबण लावूं नि मग टाकूं धुवून.

**लंऱ्याः**—बस् बस् एकदम पसंत! ठरलं हं चल आटप.

**दोघेही उघडे होऊनः**—आजी, ए आजी, आम्हाला आंघोळीला पाणी देग लवकर मग आम्हाला अभ्यासाला बसावयाचं आहे.

**आजीः**—अरे थांबा जरा, इतकी घाई नको; माझं एवढं पोतेरं झालं कीं देतें हं.

**लंऱ्याः**—थांबा ग काय, परवांवर परीक्षा आली ना! मग अभ्यास नको का करायला? आम्ही बघ कपडे सुद्धां काढून बसलोय, तर दे लवकर.

**आजीः**—बरं तर मग तुम्हीच घ्या तेवढं तपेलं; घट्ट धर हं. पाय बीय भाजेल. चुलींत जाळ नीट घाल हं. माझी अंघोळ आणि चार बरण्या धुणं व्हावयाचं आहे हं. जा लवकर.

आजी! ए आजी आम्ही अंघोळी करून नि कपडे सुद्धां धुऊन आलों बघ. चुलींत जाळ बीळ नीट ठेवलाय हं.

आजीः—अंघोळी एवढ्यांत रे कशा झाल्या? कावळे कुठले! आणि कपडेरे कशाला धुतलेत? तुमचं काय हें वय का आहे काम करावयाचं. चांगलं खायाचं, खूप अभ्यास करायाचा आणि खेळायचं हें सोडून मोठ्या माणसाप्रमाणें कपडे रे काय धुतां? बरं जा. त्या डब्यांतले एक एक किंवा दोन दोन लाडू घ्या नि खा. आणि मग अभ्यास करा हं.

**दोघेही**:–हो हो.

वार्षिक परीक्षा आतां जवळ आली होती. शंब्या, लंब्या, सद्या हें त्रिकूट एकत्र जमून त्याचाच खल करीत होतें.

परीक्षा जवळ आली याचा अर्थ ते आतां खूप खूप अभ्यासाच्या तयारींत असतील असं जर तुम्हास वाटत असेल तर तें अगदीं चुकलं. या बाबतींत त्यांच्या कल्पना वेगळ्याच होत्या. वार्षिक परिक्षेंत पास होण्यास आतांपर्यंतचा अनुभव लक्षांत घेऊन या विद्वा-नांनीं जें कोष्टक तयार केलं होतं ते बादशहाच्या बिरबलाला सुद्धां विस्मित करील असं अद्‌भूत होतं.

चवथ्या मजल्यावरच्या खोलींतून आवाज आलाच तर मांजरांच्या भांडणाचा येई; किंवा दुपारीं एखाद्या जालंदर बैराग्याप्रमाणें आपले इंगळाप्रमाणें असलेले लाल डोळे किलकिले करून घुमणाऱ्या पारव्यांचा असावयाचा. त्या जागेचा उपयोग पेशवाईचे काळांत शंब्या लंब्याचे खापर पणजे तिरंदाजीचा अभ्यास करण्याकरतां करीत अशी एक वदंता एक सुप्रसिद्ध इतिहाससंशोधक सांगत असत. गेल्या १०० वर्षांत जी खोली कोळ्यांना आपलीं जाळीं ठेवण्याकरतां उपयोगी पडली होती तीच ती खोली.......

पण आज त्या खोलींतून उंदरांच्या खडबडीचे ऐवजीं मांजरांच्या तेरी मेरीच्या ऐवजीं, पारव्यांच्या घूं घूंच्या ऐवजीं प्रत्यक्ष मानवी आवाज बाहेर पडूं पहात होता.

' शंब्या अरे शंब्या ! लंब्या अरे लंब्या ' अशा कर्णकर्कश्य आरोळ्या, हांका, त्या खोलींतून निघताहेत.

आवाज तर ओळखीचाच वाटतो. होय, तो जग्या गोखलेच होता. वासुदेव बळवंत फडक्यासारखा, त्रिंबकजी डेंगळ्यासारखा याला कैद

कोणी करून ठेवला आहे, याचें कारण आपणास शोधावयाचें असेल तर शंब्या लंब्या यावयाचे आंत आपण त्या खोलींत प्रवेश करूं.

अरे वा ! आपली चांगलीच फसगत झाली कीं; ही खोली तर अगदी स्वच्छ केलेली दिसते. इथे बिनवापरांतले झोपाळे पडले नाहींत, लग्नाकार्यांत लागणारीं मोठ्ठी भांडी येथें अस्ताव्यस्त पडलीं नाहींत, पाय मोडक्या शिसवी खुर्च्याही येथें नाहींत, रंग आणि लोकर उडून गेल्यानें तरटाच्या अवस्थेला जाऊन पोचलेले गालीचेही येथें नाहींत. सहा पायांच्या कोष्ट्यांनी तयार केलेली धूसर रंगाची मलमल येथे ऐसपस वाळत घातलेली दिसत नाहीं. खेळांतल्या चावीच्या मोटारीप्रमाणें या बिळांतून त्या बिळाकडे चालू असलेली उंदराची रहदारीही येथे आज दिसत नाहीं. आज या खोलींचें परिवर्तन हुशार मुलांच्या सुन्दर नि सज्ज खोलींत झालें आहे. कालची ती विजापूरची गोलघुमट, शंब्या नि लंब्यांच्या कष्टानें आज सुन्दर ताजमहाल बनून गेली. एवढी अडगळ उचलून बाजूला करून ठेवण्याचें काम शंब्या, लंब्या सद्या यांनी कां केलें याचें कारण —वार्षिक परीक्षा.

गोखलेला येथें कोंडण्याचें कारण वार्षिक परीक्षा.

एका दिड तासानंतर.

**लंब्याः**—हं गंगा नदी कोठें उगम पावते. ?

**जग्याः**—हिमालयांत वाहते कशी, हिमालयांतून निघून खाली खाली वहात बंगालमधून बंगालचे उपसागरास मिळते. [ कलकत्ता कोठें आहे ? ] बंगाल्यांत एक उत्तम व्यापारी शहर फार जुनें आहे. [हं बस. सुन्दर ! ] हा वरील संवाद जग्या व शंब्यांत चालला होता. जग्याला वार्षिक परीक्षा जवळ आली कीं, असा मित्रराष्ट्रांकडून कैदखाना मिळे व याला कारण तो या चौफुल्यांत जरा हुशार आहे;

व या त्रिकुटाचा अभ्यास न करतां कॉपी करून मार्क मिळवण्याचें तो एक साधन आहे; व त्याला या तिघांच्या उनाडपणामुळें अभ्यासास वेळ मिळत नसे तो हे त्याला असा कैद करून मिळवून देत. आपणाला वाटलें असेल शंब्या कंपू आतां जोरांत अभ्यासास लागला असेल पण तसें नाहीं; ते आपले नित्याचे कार्यक्रम करीतच आहेत. व याला कारण त्यांचें युक्तिबाज डोकें. ते जग्याला असा कोंडून ठेवतात म्हणजे त्याला जेवण, खाणं, फिरणं, खेळणं बन्द करतात असं नव्हे बरंका. ते तर त्याच्याकडून आपलें मोठें अभ्यासाचें काम होणार व विशेष दगदग न घेतां परीक्षा देतां येणार म्हणून त्याला फार जपतात. दर दोन तासांनीं तिघांपैकीं एक त्याला खायला आणून देई व तीन तासांनीं त्याला वरीलप्रमाणें प्रश्न विचारून सोडून देई. व मग एका वर्गांतील हुशार मुलाकडून त्याची परीक्षा घेतली जाई. त्यांत यानें नीट उत्तरें दिलीं कीं सारे हुंदडायला पूर्ण मोकळे.

तें पहा खोलींत काय दिसतें आहे. कांहींतरी पिवळसर असून बशींत दिसत आहे. हंः तें कांहीं खाद्य असेल हो ! बरोबर आहे. कालच आजीनें केलेली ती शेव आहे. ती येथें कोठून बरें आली. हं. ती शंब्यानीं आज आजीचा जरा डोळा लागला असतां काढून ठेवली व आतां ती जग्याला दिली. असेच ते दररोज पाळीपाळीनें कधीं स्वतःच्या नांवाचें, कधीं मित्राला म्हणून व कधीं दडपून कांहींतरी खाऊ जग्याला आणून देत. आहे कीं, नाहीं जग्याची चंगळ. पहा कसा हसत हसत खातोय पण हें सारें चाललें आहे कशाकरतां तर वार्षिक परीक्षा ! आहे कीं नाहीं सुन्दर नि सुलभ युक्ति ?

तालमीतल्या इतर दोस्तांनी ज्या पहिलवानाशीं कुस्ती ठरलेली आहे त्याला खुराक द्यावा त्या प्रमाणेंच शंब्या लंब्या उदार अंतःकरणानें, त्यांच्या बुद्धीच्या दृष्टीनें नाना फडणवीस असलेल्या जग्या

गोखलेला हा खुराक चारत होते. जग्या गोखलेचे व त्यांचे फार पूर्वीं पासून तहनामे ठरलेले असत. त्यांत युद्धाची बाजू शंब्या लंब्या व सद्या या त्रिफळयानें सावरावी व राज्यकारभार ( परीक्षा ) यांची बाजू जगू गोखले ( नानानी ) संभाळावी. जसे राज्यकारभारांत नाना हुशार, तसे हे शिंदे, होळकर, गायकवाड युद्धांत हुशार, यामुळें हा कंपू हुशार व सर्वश्रेष्ठ ठरला होता.

नित्यनियमाप्रमाणें ते आजही खिडकींतून आंतील जग्याचीं सारीं पुस्तकें काढून घेऊन त्याला प्रश्न विचारीत होते. त्यानें बरीचशीं उत्तरें बरोबर दिल्यावर—उद्यां जास्त चांगलें वाच हा उपदेश करून या त्रिकुटानें त्याला मोकळा केला व सारे खेळावयास बाहेर पडले. आजी व त्यांच्या इतर हितचिंतकांनी त्यांना विचारल्यास ते आज आम्ही शें. ८० मार्क मिळवण्याइतका अभ्यास केला असें सांगत व जेव्हां जग्या सर्व नीट बरोबर उत्तरें देई तेव्हां ते आतां आम्ही १०० च्या शंभर मार्क मिळवणार म्हणून सांगत. हें ढब्बे मास्तरांना सुद्धां खरें वाटे व ते इतर मुलांना म्हणत 'पहा शंब्या कंपू जसा भांडणें, मान्यामान्यांत पटाईत आहे तसा अभ्यासांतही आहे. नाहीं तर हा बन्या कधीं अभ्यास केलाय! नांव नको. तसेच हे सारे जन्या, मन्या रंग्या उडाण टप्पू लेकाचे!' या बोलण्यावरून कंपू अगदीं साराच उनाड होता असें नाहीं. त्यांत रध्या व बन्या हे हुशार होतेच पण त्या मुलांना आमच्या शंब्यासारखें डोकें असेल तर ना! सारेच गाढव.!

झालें परीक्षा उद्यांवर आली. शंब्या कंपूची कॉपीची पूर्ण तयारी झाली. कोणी कसें पहावें, कुणी कसा पेपर दाखवावा सारें अगदीं नीट ठरवून घेतलें. उद्यां परीक्षेस बसावयाचेंच राहिलें. पण.......

हा बेत बन्या कंपूला कळला; पण आतां कळून उपयोग काय ? ते तर सारे नापास होणार ठरलेंच अगदीं. पण तेवढ्यांत त्यांनीं लुच्चेगिरी केली. त्यांच्यांत वर्गमंत्री जन्या होत्या. ~~त्यानें परीक्षेच्या~~ जागा सर्वांच्या नीट ठरवल्या. शंब्या, लंब्या व सद्या हे अगदीं पुढें ठेवले व त्यांचे पुढें पहिला एक श्रीमंताचा बावळट मुलगा बसवला; आणि जग्याला सर्वांत शेवटीं बसविलें; पण यांनीं आपला बेत बदलला नाहीं. एकमेकांचें पाहून लिहावयाचें हा अगदीं त्यांचा पूर्ण निर्धार. मग पुढें जग्या असो नाहीं तर कोणी असो. ठरलें म्हणजे ठरलें.

झाला पेपर सुरू झाला. पहिलाच पेपर मराठीचा होता. प्रश्न-पत्रिका ढब्बे मास्तरांनीं साऱ्यांना दिल्या. हे तिघे जरा बुचकळ्यांत पडले; कारण अभ्यास केलाच होता कुठें ? पण बन्या कंपूला उत्तरें तर येत नव्हतींच पण पुढच्याचें पाहून लिहीण्याची अक्कल नव्हती. यांनीं समोर पाहिलें, पहिला मुलगा लिहूं लागला त्यांनी एक वाक्य लिहीलेलें पाहतांच शंब्यानें तेंच लिहिलें. झालें लागोपाठ भराभर टाक सुरू झाले.

तीन तासांनीं पेपर सुटला. सारे बाहेर आले. शत्रुपक्षीय पेपर न सुटलेल्या रडव्या मुखानें यांना हसत होते. हे जग्याला भेटले व आपली चुकामूक कशी झाली, मग आम्ही पेपर कसा लिहिला तें सांगूं लागले. चर्चेनंतर त्यांना वाटूं लागलें उगीच आपला बेत फसला. काय करावं यंदा फुकट नापास व्हावं लागणार पण जग्या त्यांना धीर देई व म्हणे अरे ईश्वर करतो तें साऱ्यांच्या कल्याणासाठीं असतें. मग आतां काय बोलतोस. बरं चला आतां उद्यांच्या पेपराची तयारी करूं चला. [ सारे जातात. ]

अशा तऱ्हेनें ५।६ दिवसांत पेपर सर्व संपले. जो तो जग्याचे उत्तराबरोबर आपलीं उत्तरें ताडून पाहूं लागला. पण एकही बरोबर

दिसेना. झालें त्यांना आतां तोहि आधार नाहींसा झाला. सारे अगदीं मनापासून हळहळूं लागले. पण इकडे जग्या! त्याची स्थिति याहिपेक्षां बिकट झाली. या तिघांबरोबर हळहळावें तर तो दांभिकपणा दिसेल व स्वत: चांगला लिहिल्यानें हसावें, तरी वाईट, गप्प बसावें तरी वाईट यामुळें त्याला खेळणें, खाणें, पिणें सुचेना असे ६।७ दिवस गेले.

आज गुरुवार १७ एप्रिल हा आजचा दिवस उजाडला. आज मास्तरांची कोण धांदल! त्यांना आज अगदीं एक डोक्यावरचें मोठें ओझें नाहींसें झाल्यासारखें वाटत होतें. सार्‍यांनीं रात्रीचा दिवस करून एकदाचे पेपर तपासून निकाल तयार केला होता. आज त्यांना ओझें हलकें झाल्याचा व पेढे मिळण्याचा दिवस म्हणून अपरंपार आनंद झाला होता.

घणणण घंण् घंण् घणणण घंण घंण घंण. सकाळीं ७॥ वाजतांच घंटा झाली. सारीं मुलें आज अगदीं वेगळींच दिसत होतीं. हं त्याचें कारणही तसेंच गंभीर स्वरूपाचें आहे. आज त्यांचा निकाल आहे ना!

बरोबर ९॥। वाजतां मुख्याध्यापक ५ वींत आले. त्यांच्या हातांतील तांबडी निकाल फाईल मुलांना फार भीतिदायक वाटली. निकाल वाचनास आरंभ झाला. परिक्षेच्या क्रमांकाप्रमाणें निकाल वाचन सुरू झालें.

पद्माकर शंकर साठे—पास.
शंभूराव गणपतराव बहिरे—पास.
सदाशिव येसबा रंगारी—पास.
लंबोदर गणपतराव बहिरे—पास.
बनेश्वर यज्ञेश्वर अब्रम्हण्यम्—नापास.
रंगनाथ परशराम येवले—नापास.

रघुनाथ सखाराम पंडित—वर घातला.
जगन्नाथ सदाशिव गोखले—नापास.

इतका वेळ स्वतः पासच्या आनंदांत असलेलें त्रिकूट एकदम काळें ठिक्कर पडलें. याचें कारण त्यांचा जो नेता तोच जर पडला तर पुढें त्यांना मार्ग कोण दाखवणार ! तिघेही अगदीं या निकालानें गोठून गेले. जग्याचें तर अगदीं देहभानच हरपलें. त्यानें एकदम बाकांवर जें डोकें ठेवलें तें बराच वेळ वर उचललेंच नाहीं. यामुळें तर त्या तिघांच्या तोंडचें पाणीच पळालें. पण एका वरचे वर्गांतील समंजस मुलास हें कळतांच त्यानें जग्याचे डोक्यावर पाणी थापून त्याला सावध केलें व त्यास या तिघांचे मदतीनें घरीं पाठवलें. यानंतर दुसरे दिवशीं जग्याचे घरीं त्याच्या नापास होण्याची ते चर्चा करूं लागले. त्यांत सर्यानें एक प्रश्न विचारला—अरे तू प्रश्नांची उत्तरें तरी काय दिलीं आहेस तें तरी आम्हाला सांग मग पाहूं. हं बोलः— तूं निबंधाचे पेपरांत हिंदुस्थानला स्वातंत्र्य कशानें मिळेल याचें उत्तर काय लिहीलेस. जग्याः—मी होय, आपले लोक एकत्र होऊन जेव्हां सारे ब्रिटिशांविरुद्ध उठतील व लष्करी सामर्थ्यानें त्यांना आपल्याला तोंड देतां येईल तेव्हां. शंड्याः—अरे असें नाहीं द्यावयाचें. हिंदुस्तानला ब्रिटिशांना ते स्वातंत्र्य द्यावयाची इच्छा होईल व ते देतील तेव्हां. असें द्यावयाचें. बरं दुसरें ? इतिहासाच्या प्रश्नांत राजा शिवाजी आतां जिवंत असतां तर ? याचें काय तूं उत्तर दिलेंस. जग्याः—मी तो असता तर त्यानें आपलें हळूं हळूं सैन्य जमवून इंग्रजांशीं गनिमीकाव्यानें लढून स्वातंत्र्य मिळविलें असतें असें लिहीलें. तुम्ही काय लिहिलें ? अरे आम्ही होय. १ आम्हाला शिवजयंतीची सुट्टी मिळाली नसती व आम्ही त्याचा उत्सव केला नसता. २ आम्ही त्याचे सरदार बनून मोठ्या पगाराच्या जागेवर मजा मारीत बसलों असतों. आणि

तूं भूगोलाच्या रे ह्या प्रश्नाचें काय लिहीलेंस ? जग्या:—कोणत्या ? पृथ्वी सूर्याभोंवतीं फिरते हें खरें आहे का ? उदाहरणासहित द्या.

**जग्या**:—हं मी असें लिहीलें कीं पृथ्वीच फिरते खरें. कारण ऋतुमान बदलतें, जहाज लांब असतां आपणास त्याचें शीड व मग मध्य व शेवटीं सर्व जहाज दिसतें म्हणून.

**लंब्या**:—हॅः अरे साफ चुकलास पृथ्वी फिरतच नाहीं. समजा जर एकादा चेंडू घेतला व त्याला एक ठिपका दिला जर तो चेंडू फिरवला तर तो ठिपका ही फिरेल त्याचप्रमाणें आपण पृथ्वींतलीं माणसें पण रात्रीं निजलों व पृथ्वी फिरूं लागली तर आपल्या अंगा-वर पलंग व खालीं आपण होऊं पण तसें होत नाहीं म्हणून ती फिरत नाहींच हें खरें.

**तिघेही**:—बघ लेका, तूंच जर आमची कॉपी केली असतीस तर पास झाला असतास.

**जग्या**:—छे रे बाबा ! अशीं गाढवपणाचीं उत्तरें लिहून पास होण्यापेक्षां मला नापास झालेंलेच परवडलें.

कारण काय, अरे तुम्हाला माहित आहे का तुम्ही ज्याची कॉपी केली तें रत्न साठे हें आपल्या पलिकडच्या आळींतील साठे कापडवाल्यांचें रत्न. त्यांना पास होणसाठीं त्याच्या वडिलांनीं ढब्बे मास्तरांना कांहीं कपडे दिले होते व त्यामुळें त्याचे पेपराप्रमाणें त्यांनीं तुमचे पेपर तपासून तुम्हाला केलं पास व आम्ही वेगळे उत्तरवाले पडल्यानें झालों नापास.

बरं चला तुम्ही तिघेही पास झालांत ना उत्तम ! तुम्ही पास म्हणजेच मी पास.

**सद्या**:—आणि तूं नापास म्हणजे आम्ही सारे नापास. तें कांही नाहीं तूं खरा पास होणारा पास झालाच पाहिजे.

**झंड्या**:—तूंच आमचा नाना फडणवीस जर मागें राहिलास तर ह्या राज्यकारभाराचा गाडा चालायचा कसा ? तें कांहीं असलें तरी तूं पास झालाच पाहिजे.

**लंब्या**:—अरे हो नुसते 'तूं पास झालाच पाहिजे म्हणून नुसते ओरडण्यांत काय अर्थ ! याचेवर कांहीं उपाय काढाल कीं नाहीं ?

**सद्या**:—तर मग असें करूं या कीं आपण हेडमास्तरांना हें सारें कळवूं व जग्याचे तुम्ही पेपर परत पहा असें सांगूं. बस् ठरलेंच तर उद्यां चौघांनीं जायचेंच.

चौघेही हेडमास्तरांकडे गेले. त्यांना वृत्त सांगितल्यावर त्यांनीं पेपर पहावयास ढब्बे मास्तरांना सांगितलें.

**हेडमास्तर**:—मिळाले कांहो पेपर ?

**ढब्बे मास्तर**:—हो हो, तपासावयास सुरुवात केली आहे.

**हेडमास्तर**:—किती वेळ लागेल.

**ढब्बे**:—फार नाहीं. एक अर्धा पाऊण तास.

**हे. मा.**:—बरं मुलांनो तुम्ही जरा बसा.

कांहीं वेळानें ढब्बे मास्तर सारे नीट तपासून आणून देतात व सांगतात.

**ढब्बे**:—सर माझ्या नजरचुकीमुळेंच असें झालें. हा खरा पास.

**हे. मा**:—जगू....चाळ तूं पास आहेस हो जा आतां. पेढे वांट हं. जगू नमस्कार करतो व चौघेही बाहेर पडतात.

**तिघे**:—काय आहों कीं नाहीं मित्र, अरे बाबा संकटकालीं जो मित्र तोच खरा मित्र. बरं आतां आपल्याला एक झकास पार्टी पाहिजे बोवा.

**जगू**:—बर आपण परवां रविवारीं चार वाजतां आमच्या बागेंत जमूं, ठरलं. आहे सर्वांना पसंत ? हो हो.

३॥। वाजले आहेत; शंब्या कंपूच्या दिवाणखान्यांत ते तीघे आले आहेत. जगू घरांत कांहीं खाद्य पेयें आणण्यांत गुंतला आहे. सर्वांना बशा दिल्यावर........

**जगू**:--हं मित्रहो तुम्ही मला दाखवलेल्या आनंदाच्या दिवसाबद्दल मी तुमचा फार आभारी आहें.

**तिघेही**:--कसलं कसलं ! सारं तुझंच शौर्य.

**जगू**:--बरं तर आतां सुरुवात करा व आमचा हा अल्पोपहार गोड माना.

**सद्या**:--अरे हा शिरा, ह्या करंज्या, तसेंच हीं केळीं, पेरु, पुन्या. सारेंच गोड असताना आणिक काय गोड मानावयाचें. [ फराळ आटोपल्यानंतर ]

**लंब्या**:--ए आतां 'केरम' काढ. आपण मित्रत्वाचा सामना खेळूं. कांहीं काळानंतर.

**शंभ्या**:--आतां पुरे. बरं आम्ही जातों आतां. तूं पास झाल्यानें आपल्या चौकूल्यांत आतां आनंद आहे व तोच कायम टिको. चलरे लंब्या, सद्या चला. नमस्ते जग्या.

**जगू**:--नमस्ते.

आजचा दिवस ! ज्या दिवशीं प्रभू रामचंद्र वनवासांतून परत आले, ज्या दिवशीं मराठे वीर शत्रूचा देश पादाक्रांत करून विजयानें स्वदेशीं येत, ज्या कालीं धनधान्य पिकून सर्वत्र समृद्धता येते, तो हाच नव वर्ष दिन. सृष्टींतलि गर्द हिरवेंपणा जाऊन पीवळसर छटा येऊं पाहणाऱ्या दिवसांतील हिरवा नि पिवळा दुवा सांधणारा सुदीन तो हाच ! याच त्या मंगलकालीं सारीं ....आमच्या पुण्याचीं मुलें उन्हाळा जवळ आला व आंब्यां चिंच चा हंगाम आला, परीक्षा संपून हुंदडायचा काल आला म्हणून विशेष आनंदांत दिसत होतीं. जो

तो सकाळीं उठून प्रथम ज्या ईश्वरानें आपणांस हा सुदीन दाखवला त्याला अभिवादन करण्या करतां गुढ्या तोरणें उभारण्याच्या तयारींत होता. घरांत आज कांहीं गोऽड गोऽड खाऊ होणार म्हणून लहान मुलें स्त्रियांच्या पाठीस लागलीं होतीं, त्या त्यांना दूर जाण्यास गोड शब्दांनीं विनवूं पहात होत्या, पण मुलें हालत ना म्हणून त्यांच्या हातावर कांहीं गोड पदार्थ ठेऊन त्यांना बाहेर लावीत होत्या. रस्त्यावरून निरनिराळ्या प्रकारचे निरनिराळे लोक निरनिराळे साधे पण स्वच्छ नि सुंदर पोशाख करून मिरवत. मंदगतीनें लोकांची गर्दी, गुढ्या, तोरणें पहात जात होती. आज सर्वांना सुट्टी असल्यानें पर्वती, हनुमान टेकडी, व इतर ठिकाणीं फिरण्याजोगी गर्दी विशेष दिसत होती. साऱ्यांच्या तोंडावर आज विशेष प्रकारचा आनंद दिसत होता. वाटेंत मेवामिठाईवाले, फुलवाले ध्वजवाले, आपला माल खपावा म्हणून धडपडत होते. त्याच वेळीं मराठी शाळेत ५।६ वींतील मुलें आपल्या लहान भावाबहीणींस सुंदर पोशाख करून शाळेत पाटी पूजनास गेलीं होती.

पाटी पूजन झालें; मुलांनीं आपल्या जवळील खाऊ मास्तरांजवळ वाटण्यास दिला व सर्वांच्या मिश्रणाचा प्रसाद घेतला. इतक्यांत सूचनेचा शिपाई वर्गात आला.

मुलें आश्चर्यानें त्याचेकडे पाहूं लागलीं. सूचना मास्तरांनी वाचून दाखविली. त्यांत ' आज चार वाजतां आपल्या शाळेच्या चित्रकला वर्गात श्री. ढब्बे मास्तर, पांचवडकर ( मुख्याध्यापकाचे ) अध्यक्षतेखालीं मुलांना पाडव्याचें महत्त्व सांगतील तरी सर्वांनीं हजर राहावें. या नंतर शाळा सुटली.

दुपारचीं जेवणें अगदीं नुकतीच आटपलीं होतीं. मुलें भरपूर नि व्यवस्थित जेवण झाल्यानें जरा स्वस्थ होतीं. इकडे आमच्या

शंब्याकडे आजी जरी म्हाताऱ्या असल्या तरी घरांत मुलांना आज पाडव्याला आपल्या हातून चार गोड पदार्थ मिळावे म्हणून धडपडत होत्या. साधारणतः एकचे सुमारास तीं तिघेंही एकदम जेवावयास बसलीं होतीं. १॥ ते २॥ चे सुमारास सर्व जेवण आटपून जरा पडले होते इतक्यांत 'शंब्या ए शंब्या! अरे लंब्या' अरे झोंपलांत कीं काय? अरे आपल्याला ४ वाजतां शाळेंत जायचंय ना? मग असे झोंपलांत काय? चला आतां ३। वाजायला आले आतां निघूं या. सद्या गर्जला 'अरे हो इतका काय उतावीळ झाला आहेस, जरा दमानं घे. या नंतर थोड्या वेळानें निघूंच. थांब कीं जरा आतां काय तिथें शाळा झाडायला नाहीं जायचं, तर समारंभाला, चुकलों, चुकलों व्याख्यानाला जायचंय. थांब जाऊं आतां. शंब्या आळस देत देत बरळला.

'मुलांनो तुम्हाला कांहीं खायचंय कारे?' आजींनीं प्रश्न विचारला.

**लंब्याः**—छे. मुळींच नको. आतां तर जेवण झालें. आणि फार उशीरा नाहीं कांहीं सभा सुटणार. आम्ही लवकरच येऊं. बरं दादासाहेब झोंप पुरी झाली का नाहीं? चला आतां.

शंब्या आळस देत देत उठतो व सारे निघतात.

शाळेंत सारीं मुलें जमत होतीं, शिक्षक हळूं जमत होते सारीं मुलें जमलीं. पांचवडकर मास्तर आले व मग सारीं मुलें नि शिक्षक उभे राहिले. मंदाकिनीनें स्वागतपर सुन्दर पद्य म्हटलें नि ती खालीं बसली. टाळ्यांचा कडकडाट झाला. नंतर हेडमास्तर उभे राहिले. त्यांनीं पहिले चार शब्द सांगून ढब्बे मास्तरांना सुरवात करण्यास सांगून ते खालीं बसले. ढब्बे मास्तरांनीं सुरवात केली. ते आपल्या भाषणांत म्हणाले 'मुलांनो आज आपण पाडव्याच्या सुमुहूर्तावर जमलों आहों. जरी आज आपला आनंदाचा दिवस आहे

तरी आपण आनंदांत आपलें देशाचें कर्तव्य विसरतां कामा नये. त्याकरतां आपण सहनशीलता, शक्ति, नियमितपणाची संवय हीं आजच्या वर्षआरंभीचे दिनापासून मनास लावण्यास शिकलें पाहिजे."

अशा तऱ्हेनें बराच वेळ सहज पण सोप्या शब्दांत मुलांना समजेल असा उपदेश करून ते खालीं बसले. यानंतर हेडमास्तरांनीं त्यांचे आभार मानून त्यांना हार व गुच्छ अर्पण केला. हार दिल्यानंतर त्याचा सुगंध घेऊन आनंद प्रदर्शित करण्याचे ऐवजीं ढब्बे मास्तरांचें तोंड आंबट व गंभीर झालें. लोक आश्चर्यानें पाहूं लागले. पण सभा बरखास्त झाल्यानें सारे निमूटपणें बाहेर गेले व मोठमोठ्यानें चर्चा करूं लागले. याचे शेवटचे टोकापर्यंत शंब्या कंपूनें जाण्याचें ठरविलें; कारण ढब्बे मास्तर हे त्यांचे आवडते शिक्षक होते. त्यांनीं अगोदर २ तास सारें शाळेचें त्रिभुवन धुंडाळलें व शेवटीं दाद आणणाऱ्यानें त्यांना सारा कट सांगितला. या कटाचे बुडाशीं बन्या कंपू होता व त्यानेंच यांचे हारावर कडू करंजेल तेल शिंपडलें होतें व त्याचें कारण काय तर ते नापास झाले होते, ना ? तर त्यांना वाटे आपल्याला ढब्बे मास्तरांनीं मुद्दामच नापास केलें असावें व त्याचाच सूड उगवण्याकरतां हा भयंकर हलकटपणा त्यांनीं केला. पहा कसा आहे हा दुष्टपणा ! शंब्यालंब्यांनीं त्यांचा प्रथमचाच गुन्हा असल्यानें त्यांनीं तो नुसता लक्षांत ठेविला.

यानंतर रामनवमीचा दिवस ! आज रामजन्म म्हणून म्हातारे कोतारे सारे आज उपास करणार होते. मुलांना सुट्टी असल्यानें तीं आपलें जेवण नव्हे अल्पोपहार आटपून उपासकांच्यावर हल्ला करीत होतीं. उपासक प्रथम नकार घंटा वाजवून शेवटीं मुलांना हातावर कांहीं ना कांहीं तरी ठेवतिच होते, नव्हे तीं मुलें ठेवायला लावीत होतीं.

आज रामजन्म ! साऱ्या पेठेंत अगदीं कोपऱ्यावरच्या रामाच्या जन्मासाठीं ९ वाजल्यापासून धुमाकूळ चालला होता. दुकानदार सर्केशींतील शिकारखान्याप्रमाणें आधीपासून तंबू राहुट्या आणून जागा पटकावीत होते. १०॥ च्या सुमारास पुजारी राममंदिर सुशोभित करीत होते. बाहेर दुकानदार आपलीं छोटेखानी दुकानें थाटून त्यांची निरनिराळ्या स्थितींत निरनिराळे पदार्थ आकर्षक रितीनें मांडून शोभा वाढवीत होते. त्या वेळेपासून त्या चौकाला अगदीं यात्रेचें स्वरूप आलें होतें.

आजचे किर्तनकार ! बक्षीस समारंभ असो, बालदिन असो, आभारप्रदर्शन असो, अभिनंदनपर सभा असो कीं दुःखप्रदर्शनाची सभा असो, आमचे ढब्बे मास्तर आपले त्यांत सदोदीत पुढें असावयाचेच. त्याचप्रमाणें आज रामनवमीचे कीर्तनकार तेच होते. आणि आमचेकडे शंब्याकंपूचा अगदीं किर्तनास जाण्याचा जो हट्ट होता तो याचकरतां. सरतेशेवटीं शंब्या लंब्यांचा कंपू निघालाच.

११ वाजले. देवळांत पुष्कळ गर्दीस सुरवात झाली. बऱ्याच वेळानंतर तबलजींचें नि पेटीवाल्याचें संगनमत होऊन कीर्तनास सुरवात झाली.

रामाच्या गाभाऱ्यापासून ४।५ फुटांवर एक मोठें सतरंजीवजा जाजम व त्यावर एक गालीचा घातला होता. डाव्या बाजूला मुकुंदा बंडीवाला हा आपला तबला घेऊन ठाक ठोक करीत बसला होता. त्याच्या जवळ थोड्या अंतरावर हरिबा पेटीवाले बसले होते. मध्यभागीं गालीच्यावर ढब्बे मास्तर उभे असून त्याचे पाठीमागें त्यांचाच भाचा सखाराम हातांत झांजा घेऊन उभा होता. ढब्बे मास्तरांच्या डोक्यावर एक फुलांच्या माळांनीं सुशोभित असा एक चांदीचा

पाळणा असून त्यांत हिरव्या जरीच्या खणांत एक नारळ गुंडाळून ठेविला होता.

ढव्ळे मास्तरांनीं प्रथम ईशस्तवन करून 'संत असें म्हणतात कीं....' अशा पद्धतीनें बाराला ५ मि. कमी असे तों कीर्तन चालू करून मग—त्याचा ओघ श्रीप्रभूरामचंद्राचे मातृमंदिराकडे वळवला व ५ मिनिटांत 'अशा तऱ्हेनें आजच्या या शुभदिनीं प्रभूरामचंद्र जन्मले' असें सांगून कीर्तन संपविलें. साऱ्यांनीं आपलीं आणलेलीं प्रेम सुमनें श्रीप्रभू रामचंद्राचे चरणीं उधळलीं. आधींच तांबडीं फुलें, नि त्यांत गुलाल उधळला, तेव्हां तो देखावा सूर्योदयापूर्वीचा शेंदरी तांबूस रंगच वाटला.

पाळणा ढव्ळे मास्तरांनीं खालीं घेतला, त्याचें मंगल पूजन केलें व कांहीं भाविक लोकांना ती बालनारळमूर्ति राममूर्ति म्हणून अवलोकानार्थ प्रेमानें दिली व मग परत तिला पाळण्यांत ठेविलें.

सारे लोक किर्तनकारांचे पायावर डोकें ठेवून त्यांचा आशीर्वाद घेऊन आपापल्या जागीं बसत होते.

शंब्याही कीर्तनकार करंदीकर मास्तरांना नमस्कार करून आपल्या जागेवर येऊन बसत होता, इतक्यांत त्याच्या कानावर काय फुटबॉल, काय मोटारची भरलेली ट्यूब, काय तंबोरे...असले राग आणणारे शब्द पडले. शंब्यानें पाठीमागें वळून पाहिलें तोंच, शत्रु पक्षांतील हिटलर मुसोलिनीच्या दर्जाची बन्या, जन्या, रध्या, रंग्या हीं मुलें त्याच्या नजरेस पडलीं. शंब्यानें लंब्याला हळूच खूण केली आणि जवळ बोलवलें, तेवढ्यांत सद्याही बुवांना नमस्कार करून तेथें आला. जग्या तर तेथें होताच. शंब्या त्यांला म्हणाला, "ऐकलंत ना !"

त्यावर सद्या म्हणाला, "तंबोरा म्हणालेला मी ऐकलंय"

अगदीं बरोबर ! शंब्या म्हणाला.

" मोटारची भरलेली टयूब हें मी ऐकलंय " लंब्या म्हणाला.

" अगदीं बरोबर " ! शंब्या म्हणाला.

" फूटबॉल म्हणालेला मी ऐकलंय " जग्या म्हणाला.

" बस्, बस् बस् अपमान व्हावयाला अजून काय पाहिजे, माझा या शंब्याचा अपमान तो तुमचाही अपमान " शंब्या संतापानें बोलत होता.

" होय ! होय ! तुझा अपमान तोच आमचा अपमान " तिघेही एकदम गर्जले.

या पुढें कीर्तन चालूच होतें पण या तिघांचें लक्ष कांहीं या अपमानामुळें तिकडे लागणें शक्य नव्हतें. कारण त्यांचा एवढा मोठा अपमान झाला होता.

भर सभेंत मास्तरांपुढें, गावांतल्या लोकांपुढें नि लहान मुलांपुढें यांचा अपमान ? सगळ्यांपुढें एवढी छीः थूः कोणाला सहन होणार ? ह्याच कारणानें त्यांचे लक्ष किर्तनांतून पार उडालें. करंदीकर मास्तर, आपल्या गोड नि मधुर आवाजानें कीर्तनाला रंग भरीत होते. इकडे रामजन्मामुळें दशरथाला झालेल्या आनंदाचें वर्णन ऐन रंगांत आलें होतें. बुवा तो आनंदानं कसा रंगला होता याचें वर्णन निरनिराळ्या सुन्दर सुन्दर उपमा व दृष्टांत देऊन लोकांना पटवून देत होते. आणि इकडे शंब्या, लंब्या, जग्या नि सद्या ही चौकुली आपल्या झालेल्या आपमानाचा बदला कसा घ्यावयाचा याचा विचार करण्यांत गर्क होऊन गेली होती. त्यांच्यापुढें बसलेल्या एका वृद्ध माणसानें त्यांची ही कुजबूज पाहून त्यांना सांगितलें " बाळांनो, असे तुम्ही जर आपापसांत कुजबुजायला लागाल तर मला कसं बरं ऐकूं येईल; आणि एवढें असें कारण तरी काय झालं आहे गप्पा मारायला ? मगाशीं तुम्ही तर अगदीं शांत देवासारखे ऐकत बसलां

होतां, नि आतांच काय झाल तें तरी मला सांगा. माझ्याकडून तुमचें दुःख कांहीं निवारण होण्यासारखें असल्यास मी तें जरूर करीन. मला तुम्हां मुलांचा मोकळा स्वभाव फार आवडतो. कथा संपली ना कीं, मग सारे मला सांगा, मी रामाचे देवळापाठीमागें तें गुडदाणीचें दुकान आहे ना, तेथें उभा राहीन. नि मग मी तुमच्या साऱ्या तक्रारी ऐकून तुम्हांला निकाल देईन. कोणी जर तुमच्या वाटेस गेले असतील तर त्यांना चांऽगली शिक्षा करीन." असें म्हणून म्हातारे बाबा थांबले. त्यावर शंठ्या लंठ्या चट सारे चूप बसले व कथा पूर्ववत् नीट ऐकूं लागले. म्हातारा तसाच जबरा होता, त्याचें बोलणें चालणें आणि रुबाबच असा होता कीं, त्यानें बोललेलें सर्वांनीं ऐकावें. आपल्या हेड मास्तरांनीं जरी त्यावेळीं त्यांना थांबण्यास सांगितलें असतें तरी त्यांनीं तें ऐकले नसतें; परंतु प्रथमदर्शनींच या बुढ्या बाबानें त्यांचें चित्त आपल्या प्रेमळ बोलण्यानें वेधून टाकून त्यांना आपलें ऐकावयास लावलें. कोण होता बरें तो? मनुष्य?

कथा संपली आणि सर्व माणसें उभीं राहिलीं. आणि शंठ्या लंठ्या समोर लक्ष देतात तों काय चमत्कार! एवढा वेळ जवळ पुढेंच बसलेला म्हातारा त्यांना कोठेंच दिसेना. मुलांना अचंबा वाटला. शंठ्याचें तर डोकेंच चालेना, सदू रंगाऱ्याला तर डांबराच्या पिपांत घातलेले हात बाहेर काढल्यावर ज्याप्रमाणें पांढऱ्या स्वच्छ हबकानें माखलेले दिसावे तसें आश्चर्य वाटलें. जग्याला आपण अरेबीयन नाइट मध्यें वावरणारे एकादे अलीबाबा तर नव्हेना असें पळभर वाटलें. लंठ्याची तर कांहीं कल्पनाच चालेना; तरीपण धीर धरून ते निमूटपणें देवालयाच्या बाहेर आले; आणि आपलीं पादत्राणें जेथें काढलीं होतीं तेथें येऊन पोहोंचले. पण काय उपयोग? त्यांच्या शत्रुपक्षानें त्यांचे पायपोस त्यांच्या पायांत राहूं नयेत म्हणूनच की

काय शंब्याच्या 'करकरीत' कोंकणी वहाणा, लंब्याच्या नाजूक श्याम-सुंदर रेशमी बनातीनें मढविलेल्या चपला, जग्याचे रबरी कॅनव्हॉसचे बूट, आणि सदू रंगाऱ्याचे नुकतेच नाल मारलेले कलाबती काम केलेले आग्र्याचे चढाव हे सारे लंपास केले होते. आतां असें अनवाणी घरी गेल्यावर वस्तू हरवल्याबद्दल आई वडील आपली हजेरी घेतील या विचारानें हे चौघेही खिन्न झाले. इतक्यांत ते चालतां चालतां राममंदिरापाठीमागील गुडदाणीच्या दुकानापाशीं येऊन पोहोंचले. आणि तेथें पहातात तों तो तेजस्वी म्हातारा सांगितल्याप्रमाणें त्यांची वाट पहात उभा असलेला त्यांना दिसला.

" या, मुलांनो....सांगा काय तुमचें म्हणणें आहे तें; पण नकाच सांगू, मी सारें ओळखलें आहे. मी जाणतों, माझ्यापासून कोणी कांहीं लपवून ठेवूं शकत नाहीं, माझें नांव बजरंग असें आहे. तुम्ही मला त्याच नांवानें हाक मारत चला. मी या गांवात राहात नाहीं, परंतु तुम्हाला माझी जरूर लागेल तेव्हां तेव्हां या राममंदिरांत येऊन मोठ्यानें 'बजरंगा धांवरे' अशी मोठ्यानें हांक मारा म्हणजे मी कुठेंही असलों तरी धांवत येईन व तुमच्या अडचणीं दूर करीन. आतां तुम्ही दुःख करूं नका; तुमचीं पादत्राणें गेलीं आहेत तीं जाऊं देत; त्या बदली हीं भारी किंमतीचीं जरतारी पादत्राणें मी देतों तीं आनंदानें पायांत घाला. घरीं हीं कोणी दिलीं असें विचारलें तर बजरंग बाबानें दिलीं असें सांगा. आणि शंब्याच्या देवळांत झालेल्या अपमानाबद्दल मी पुरा बदला घेऊन टाकला आहे. उद्यां सकाळीं जेव्हां त्यांना पहाल तेव्हां बन्या कंपूतील खोडी करणाऱ्या साऱ्या पोरांचे डावे पाय हत्तीच्या पायासारखे फुगलेले दृष्टीस पडतील. त्यांनीं शंब्याला फोफशा म्हणून चिडवलें त्यांना तशी अद्दल कांहीं दिवस घडलीच पाहीजे. बरें आहे येतों मी आतां, जय बजरंग. श्रीरामचंद्रकी जय. "

एवढें बोलून बजरंग बाबा एकदम दिसेनासे झाले.

आणि मुलेंही अति आनंदानें आपापल्या घराकडे परतलीं.

रात्रीं जेव्हां प्रत्येकानें उशीवर डोकें टेकलें तेव्हां बजरंग बाबा खेरीज दुसरा विचार कोणाचेही मनांत येत नव्हता.

आणि तिकडे तो कंपू....बन्या बडवे, जन्या जागुष्टे, रग्या रणदिवे, मन्या केळुसकर हा मुद्दां निजतांना कांहीं कमी खुशींत नव्हता, कारण साहाजिकच होतें. या चार संभाजींच्या दृष्टीनें औरंगजेब असलेल्या शंब्या औरंगजेबाला पुरेपूर चिडवून झालें होतें आणि शिवाय त्या गाढवांची शाब्दिक खेटरांनीं पूजा बांधून झाल्यावर खुद्द त्यांचीं खेटरेंही यशस्वी रितीनें पळवून झालीं होतीं. याहून मोठा विजय कोणता ! हिटलरला हंगेरी जिंकून झाला असेल आणि मुसोलिनीनें ॲडिसअबाबा जिंकल्यानंतर त्याच्या गालांत मावला नसेल इतकं आनंदाचं हसूं त्यांना येत होतं. आणि त्या रात्रीं स्वप्नेंही त्यांना त्यांच्या कर्तव्याची जाणीव देणारीं पडत होतीं. जग्याला आपण शंब्याकंपूंतील जग्याची गवताच्या काडीवजा शेंडीची पेंडी हळूच कापतोय, तर बन्याला आपण कीर्तन चालू असतांना तो उभा असतां मागून ढकलून देतोय असें दिसे. रंग्याला तर आपण त्यांचीं सर्वच्या सर्व पादत्राणें हळूच रामाच्या विहीरींत टाकतोय अशी एक ना अनेक गंमतीदार नि शत्रु पक्षावर विजय मिळवून देणारीं त्यांच्या शौर्याचीं स्वप्नें त्यांना पडत होतीं. मुलांना आनंद व्हावयाला नि दु:ख व्हावयाला वेळ लागत नाहीं हेंच खरें. सकाळीं आपल्या पायांची दशा काय होणार याची त्यांना बिचाऱ्यांना काय कल्पना !

मनुष्य लहान असो किंवा मोठा असो, भविष्यकाळाची निश्चित कल्पना त्याला कधींच करतां येत नाहीं हेंच खरें.

बजरंग बाबा कोण होते हें कोणास ठाऊक ? ते देव असोत किंवा दानव असोत, जादुगार असोत, वा राक्षस असोत. परंतु त्यांच्या ठिकाणीं अद्‌भुत शक्ति निवास करीत होते हें मात्र खरें, कारण असें पहा त्यांनीं बोलल्याप्रमाणें गोष्टी होत गेल्या खऱ्या.

शनवार पेठेंतील बापट डॉक्टरांकडे आज चार समवयस्क पोरें आपल्या पायांचें दुखणें दाखवण्यासाठीं गेलीं होतीं.

आणि प्रत्येकाचा डावाच पाय चांगला मोठ्या दुध भोंपळ्या सारखा फुगला होता.

प्रत्येक मुलाच्या बरोबर गेलेले पालक डॉक्टरांनीं विचारलेल्या प्रश्नांना एकाच प्रकारची माहिती देत होते. "हा पाय कसा फुगला" असें डॉक्टरांनीं विचारल्यानंतर उत्तर देतांना ही दुःखी कष्टी पालक मंडळी म्हणाली होती "काय सांगावं, अहो काल कीर्तनाला गेला तेंव्हां पाय चांगला होता, नि रात्रीं निजतांना सुद्धां पाय ठीकच होता, हें झालें सकाळीं उठल्या नंतर. तसा दुखत खुपत नाहीं पण नुसता फुगलाय, परंतु तरी....काय झालं सूज ती सूज" चारही मुलांचे पालक चार वेगवेगळ्या बाटल्यांतून औषधें घेऊन घराकडे परतले होते. सर्वांत आश्चर्याचा जर कोणता धक्का त्यांना बसला असेल तर तो संध्याकाळीं उन्हें कलल्यावर. जेंव्हां त्यांना माहिती मिळाली कीं, रात्रीं एकत्र मिळून गेलेल्या चारही मुलांना हा पाय फुगीचा भयंकर रोग झाला आहे; तेंव्हां मात्र मानवी स्वभावा-प्रमाणें त्यांचा दुःखभाग $\frac{1}{4}$ हलका झाला, पण आश्चर्य मात्र आठ पटींनीं दुणावलें. रंग्या रणदिवेच्या वकिली करणाऱ्या वृद्ध वडिलांना वाटलें कीं, पोराला मुंगळा चावला असावा. ते इतके चिडले होते कीं, त्या मुंगळ्याच्या ऐवजीं जर एकादा मनुष्य असता तर इतर कायद्यांचीं कलमें वापरून कंटाळलेल्या म्हाताऱ्यानें त्याला

कोटांत खेचायला कमी केलें नसतें. बन्या बडवेचे वडील सोमेश्वराचे पुजारी होते. त्यांनीं तर सोमेश्वराला चार दिवस दह्याचा अभिषेक करावयाचें ठरवलें. त्याचें कारण एवढेंच कीं, गेल्या शिवरात्रीला शंकराला दुधाचा अभिषेक घातला तेव्हां गवळ्यानें दुधांत जास्त पाणी घातल्यानें आपल्यावर गिरिजावराचा कोप झाला असावा आणि म्हणूनच आपल्या लाडक्या लेकाचा डावा पाय त्या पापी गवळ्याच्या पाणी असलेल्या त्या कासंडी प्रमाणें लठ्ठभारति झाला असावा.

जन्या जागुष्टेच्या वडिलांचा पेशा सरकार दप्तरीं कारकुनीचा होता. देवाधर्मावर त्यांचा विशेष भरंवसा नव्हता, ही एक गोष्ट आणि प्राप्त परिस्थितीला दूरदर्शीपणानें तोंड देण्याची तजवीज करण्याचा त्यांचा शिरस्ता होता. त्यामुळें जन्याचें दुखणें ७।८ दिवसांवर लांबणार नाहीं असा डॉक्टरांनी भरवसा देऊनही हे आंग्लांइतले सखाराम-बापू लाकडीपाय सुताराकडून घरीं करवून घेणें बरें पडेल कीं आयता विकत आणणें नफ्याचें होईल याचा विचार करीत बसले होते. आतां राहतां राहिला चौथा नमुना. मन्या केळुसकरचे पितामह एका रेशनच्या दुकानाचे मालक होते.

त्यांचा जीव 'वजनमापांशीं' संपूर्ण समरस पावलेला होता; त्या-मुळें त्यांचा प्रत्येक विचार काटेतोल आसावयाचा. ते मनांत म्हणाले 'पोराचा साबणाच्या बारासारखा पाय गुळाच्या ढेपेसारखा झाला असेल तर झाला असेल! लागतील तेवढे पैसे खर्च करून पोराचा पाय पूर्ववत करूं. पैशाची कमतरता!...मग साखर कशाला जगांत आहे नि साबुदाणा कशाला मनांत आहे!

पालकांच्या मनाची स्थिति कशी कां असेना. आपल्याला काय करावयाचें आहे? दोन तीन दिवसांनीं हीं चारी मुलें बन्याच्या घरांत

लंगडत लंगडत एकत्र झालीं तेव्हां,........'सूत' सांगतात शौनकादिकांला........

" उगीच आपण शंब्या लंब्या कंपूचीं खेटरं पळविलीं." बन्या " मला सुद्धां तीच शंका येते, त्या खेटरं पळवण्याच्या आणि आपल्या या पायाच्या दुखण्याचा संबंध असावा; कायरे जन्या तुला काय वाटतं." मन्या केळुसकर उद्गारले."

" मला तरी तेंच वाटतं" जन्या म्हणाला.

" काय सांगूं जन्या माझी तर अक्कल गुंग होऊन गेलीय, तसं कांहीं पायाचं दुःख विशेष नाहीं पण आई म्हणते तूप खाऊं नको, बाबा म्हणतात पाय बरा होई तो साखर वर्ज, त्यामुळें गेले दोन तीन दिवस जिभेला, कांहीं गोडधोड चाखायला मिळालेंच नाहीं आणि काय सांगूं कालपासून माझ्या स्वप्नांत शंब्या लंब्याजवळ कीर्तनांत बसलेला म्हातारा सारखा येतोय नि मला म्हणतोय ' बन्या लोकांच्या शारीरिक व्यंगाची कुचेष्टा करण्याचा हा घोर परिणाम."

त्यावर जन्या म्हणाला ' मलाही तेंच स्वप्न पडलं अगदीं तोच म्हातारा '

लगेच मन्या म्हणाला " अरे माझ्याही स्वप्नांत अगदीं तेंच नेमकें वाक्य "

रंग्या म्हणाला " अरे अगदीं तस्साच माझ्या....तोच म्हातारा स्वप्नांत आला, आणि तेंच मला म्हणाला."

एवढी चर्चा करून झाल्यावर त्या साऱ्यांना वाटलें याच्याशीं त्या म्हाताऱ्याचा तर कांहीं संबंध नसेल ना? आपण शंब्या लंब्यांची टिंगल केली म्हणून त्याला राग तर आला नसेलना? सारे एकदम:-
" अरे आपण त्या म्हाताऱ्याला आपला गुन्हा कबूल करून त्याची माफी मागूं नि त्याला सांगू बाबा देवबाप्पाकडून आमचे पाय बरे

कर. पाहिजे तर आम्ही आत्तां चार वाजतां शंब्या लंब्याची क्षमा मागूं. तर देवा तूं आमचे पाय बरे कर.

यानंतर चार वाजतां ह्यांच्या पायांची सूज हळूं हळूं ओसरूं लागली, तेव्हां त्यांच्या आनंदास पारावार नव्हता. जेव्हां पाय अगदीं पूर्ववत झाले तेव्हां प्रत्येकजण आपल्या आईवडिलांस अगदीं नाचत बागडत सांगण्यास गेले. तेथें त्यांनाही फार आनंद झाला. आनंदाच्या भरांत कुणी ईश्वराचे आभार मानून खडीसाखर वांटण्याचें ठरविलें, तर कुणी, त्याचे नुसतेच आभार मानले, कुणी शंकराला महानैवेद्य करण्याचें ठरविलें, तर कुणी आपल्याला हा देवाच्या नि डॉक्टरांच्या औषधाचा नि कृपेचा प्रसाद मिळाला म्हणून दोघांनाहीं प्रेमानें वंदूं लागले. येन केन उपायेन प्रत्येक जण ईश्वराचे व डॉक्टरांचे आभार मानूं लागला.

या नंतर कांहीं वेळानें हे चौघेहीं त्या म्हाताऱ्याला सांगितल्या-प्रमाणें शंब्या लंब्याकडे जाण्यास निघाले. वाटेंतच त्यांना तो चौकडा भेटला. परस्पर नमस्कार चमत्कार झाल्यावर बन्या कंपूनें विचारलें " काय शंभूराव आणि मंडळी ठीक आहे ना ? "

**शंब्याः**—ठीक अगदी उत्तम बजरंगबाबाचें कृपेनें सर्व कांहीं ठीक.

**बन्याः**—अरे कोण बजरंग बाबा ! आणि त्याची कशी रे तुम-च्यावर कृपा ! कोण हा....आणि कसा आहे रे !

**लंब्याः**—तो एक फाऽर फार दयाळू म्हातारा आहे, तो दिसा-यला फार सुन्दर आहे.

**रंग्याः**—आणि तेजस्वीही आहेना !

**जग्याः**—हं हं आणि तुला तो कसा आहे पाह्यचं आहे का ? सांग !

**मन्या**:—नको रे बाबा, उगीच भलतच—एकदा चार दिवस त्रास झाला तेवढा पुरे. कशाला उगीच...

**सद्या**:—अरे कोणता त्रास आणि कसला....नि कुणी दिला.

**बन्या**:—अरे आमचे हे पाय असे अगदी मल्लखांबासारखे झाले होते. आतां ठीक आहेत.

**सद्या**:—आणि बरे कसे झाले?

**रंग्या**:—डॉक्टरांची कृपा नाहींतर...देवांची कृपा

**बन्या**:—बरं, जन्या....रंग्या आतां आपण मुख्य विषयाकडे वळूं.

**चौघेहि**:—शंब्यालंब्या आणि मंडळी आम्ही तुम्हाला परवा जें चिडवलं, टिंगल केली, त्याबद्दल आम्हाला क्षमा करा. आतां आमच्या पासून तुम्हाला कसलेंच भय नाहीं.

**सद्या**:—अरे बजरंगबाबाच आमच्या मदतीला असल्यावर मग आम्हांला भिती रे कसली. एक हांक मारावयाची खोटी कीं बजरंगबाबा अगदीं दत्त म्हणून उभे.

**बन्या, मन्या**:—अरे वा मगतर फार बरें; आपल्या या जन्याची ती पलीकडच्या बाजूला राममंदिराच्या खालीं उसाची नि मुंबुळ्याची बाग आहेना, तिथे क्रिनई तीं मराठ्यांची पोरं आम्हाला मारतात नि आमच्याच देखत ऊंस नि मोसंबीं पळवतात. मग त्यांना एक दिवस पिटूं. येताय काय?

**शंब्या लंब्या**:—अरे हो! एका पायावर तयार, अगदीं वाटेल तेव्हां, केव्हां निघताय बोला?

**जग्या, रंग्या**:—परवां रविवारी जाऊं, चालेल? आणि आपण सकाळींच फराळाचं बिराळाचं घेऊन निघूं नि तेथें खूप मजा करूं. ठरलं, काय....अगदीं कबूल का? बोला?

चौघेहीं—एकदम पसंत. ठरलं ठरलं.

यानंतर त्या स्टॅलीन चर्चिल कंपूचा मिलाफ झाल्यावर त्यांनी रविवारी सकाळी ६॥। वाजतां निघायचें ठरलें.

सकाळीं ६ वाजल्या पासूनच वीर बन्याबापू आपलें दुचाकी उमदें घोडें घेऊन प्रत्येकाच्या घरीं जाऊन कोणी काय घेतलें आहे, तें कसें व किती आहे व आपल्याच जन्याच्या कोथ्रूडसारख्या जवळच्या रामबागेंत जायचें असल्यानें ते पुष्कळ भरपेट आहे का कमी आहे हें ठरवून परत येत होते. बरोबर ६॥ चे सुमारास रंग्या, नंतर शंड्या व लंड्या, नंतर सद्या, रघ्या, जग्या, जन्या, सारे हळूं हळूं जमले पण चर्चिल कंपूचे मुख्य चर्चिल बन्याबापूच आले नव्हते, तेव्हां मग एकेकांनी आपल्या स्वभावानुसार तूं काय आणलेस वगैरे प्रश्न विचारण्यास सुरुवात केली. त्यांत, कुणी नुसतें थालीपीठ नि पोहेंच तर कुणी तिखटमिठाचा शिरा, केळीं, भाजलेल्या शेंगा, तर कुणी गोडाचा शिरा, पुऱ्या, कांहीं दिवसापूर्वींचे डिंकलाडू, कुणी शंकरपाळे, वडे नि कांदे बटाट्याचा रस्सा पण आमच्या शंड्या लंड्यानी तर सर्वांवरच मातच केली होती. त्यांनीं कांदेपोहे, बटाटे रस्सा व पुऱ्या घेतल्याच होत्या पण शिवाय लसणाची चटणी, धपाटी, दह्याची वाटी, केळीं, व रुग्णसाहित्य—आयोडीन, कापूस, बॅंडेजेस्, लहान कात्री, सुई, चाकू, चिमा हेही घेतले होते.

हे पाहिल्यावर सारे त्याला म्हणाले "कायरे तूं तिथे एका दिवसा पुरता फिरता दवाखाना उघडायचं ठरवलंस काय? अरे विचार तरी काय?"

**शंड्याः**—अरे असावं, कुणी झाडावरून पडला, काटा बोचला ठेच लागली, तर आपलं असलेलं बरं.

**रंग्या, जग्याः**—अरे झाडावरून पडण्याची मिती नि औषधोपचार तुलाच वाटतं!

**शंब्या**:—अरे मला कसली आलीय झाडाची भिती. भिती तुम्हाला! इत्ती काय ताडाच्या झाडावर चढतो! तो झाडालाच पाडतो.

इतक्यांत चर्चिल महाशय आले. जरा उशीर झाल्याबद्दल त्यांनीं दिलगिरी दर्शविल्यावर तो आठ सैनिकांचा घोळका पुढें निघाला.

वाटेंत शंब्याची स्वारी सर्वांत पुढें चालत होती व बाकीचे सारे अगदी त्याच्या पावलावर पाऊल टाकून वीरा सारखे झपझप चालले होते. आमच्या बन्याबापूंनीं आपली पिछाडी संभाळली होती. सर्वांनीं आपाआपलें सामान जोडी जोडीनें हंसपक्षी नि कासव यांच्या सारखें काठींत घालून नेण्याचें आरंभिले होतें.

वाटेंत शंब्याला गायनाची लहर आली व त्यानें साऱ्यांनाच " कदम् कदम् बढाय जाय " हें गाणें सांगितलें, त्या वेळीं सगळे अगदीं सैनिकच भासले.

या नंतर पुढें गेल्यावर त्यांना कांहीं हिंदी नि गोरे सैनिक सकाळच्या पळण्याला जाऊन परत येतांना दिसले. प्रथम त्यांना वाटलें हा शंभूराव गजराज एकटाच चालला आहे. म्हणून एक गोरा म्हणाला ओ मिस्टर लॉरेल कमॉन कमॉन "

पण शंभूराव पुढें येण्याचे एवजी तें आठांचं टोळकेंच त्यांच्या जवळ गेलं तेव्हां त्यांना फारच आश्चर्य वाटलं. ते एकमेकांत म्हणाले " देखो कैसे अच्छे बच्चे है " कैसे दिखते है " बहोत अच्छा "

कांहींसें हिंदी बोलून ते यांना प्रेमानें मराठींतुन राऽम राऽम करून पुढें गेले.

" अयाऽयी मेलों मेलों, अरेरे देवा ! " आँ हे काय ? कोठून शब्द आले, देवा काय ! मेलों काय ! कोणी तरी संकटांत आहे खास आणि ते कोण धावले तिकडे ? अरे हीं तर मुलेंच दिसताहेत.

अरे तीं तर सात आठ आहेत. तीं कोठें पळालीं? काय गड-बड आहे! आहे तरी काय? चला आपण पाहूंच चला

तो एक मध्यमसा पेरुवाला, कोथ्रूडहून पुण्यास पेरू घेऊन चालला होता. पण हाय! त्याला फुकट मार बसला. पाठीमागून एक असाच पेरूवाला सायकल स्वार येत होता. अंधुकशा प्रकाशांत त्याला कांहींच दिसलें नाहीं. त्याची सायकल त्या दुसऱ्या पेरुवाल्यावर धडकली. सारे पेरू अस्ताव्यस्त पडले, त्या बिचाऱ्याच्या पायाला खूप खरचटलें, तोंड दगडानें फुटलें, डोक्यांतून भळभळा रक्त येऊं लागलें.

दुसरा पेरूवाला गांगरल्यानें म्हणा किंवा कांहीं साधन नसल्यानें म्हणा नुसता सायकल बाजूला ठेऊन उभा राहिला. लगेच आमचा 'देखनें मे ढब्बू चलनें मे शिवराई' असलेला परोपकारी शंब्या पुढें झाला. त्यानें त्या पेरूवाल्याला रस्त्यांतून बाजूला घेतलं. व त्यानें नि बन्यानें त्याच्या डोक्याला आयोडीन लावून पट्टी बांधली, पायाला अयोडीन लावलें, व त्याचे कपडे झाडून त्याला बसता केला.

इकडे या बाकीच्यांनी त्याचे सारे पेरू नीट टोपल्यांत भरून त्याची चुंबळ सारखी केली. व दुसऱ्या सायकलवाल्याला कृतज्ञतेनें सोडून दिलें. त्याला ते एक शब्द सुद्धां बोलले नाहींत. पण याचा परिणाम मात्र फार सुंदर झाला. त्यानें या सर्वांचीं नांवें विचारून त्यांना दोन दोन पेरू दिले व आपल्या बागेचा पत्ता देऊन तेथें येण्यास सांगितले.

बरोबर ९॥ चे सुमारास हा तांडा जन्याचे बागेपाशी आला.

बागेंत दोन मोटांनी साऱ्या उसाच्या नि मोसुंब्याच्या झाडांना पाणी जात होतें, जन्याचे अजोबा हातांत एक फावडें घेऊन साऱ्या वाफ्यांना पाणी सोडून देत होते.

हे सारे नेमके त्यांच्या पुढेंच जाऊन ऊभे राहिले, जग्यानें त्यांना नमस्कार केला. मग इतरांनीही केला.

त्यांना अचानक आलेले पाहून आजोबा अगदीं आश्चर्यचकितच झाले.

ते म्हणाले 'अरे लेकांनो, मला तरी कळवायचें, मी रामाला गाडी घेऊन पाठविलें असतें. बरं आतां इथें स्वच्छ हात पाय धुवा आणि घरांत जा. व जनू तूं सर्वांना पेला पेला दूध दे. मी एवढें काम संपवून आलोंच.

या नंतर ते सारे घरांत गेले, घरांत गेल्यावर जन्यानें प्रथम आजीला सगळ्यांची नांवें सांगून आम्ही कशाला आलों तें सारें समजाऊन दिलें. आम्ही फराळाचें आणलें आहे असें जेव्हां त्यांना सांगितलें तेव्हां त्या म्हणाल्या ' अरे आम्ही इथें असतांना तुम्ही घरून रे कशाला फराळाचं आणलंत. हें नाहीं मला पसंत. असें म्हटल्या नंतर त्यांनीं सगळ्यांना बाहेरच्या बाजेवर बसायला सांगून हरबा गड्याकडून त्यांचें सारें सामान आंत माजघरांत आणून ठेवलें, व जन्याला आंत बोलावून त्याचे जवळ आठ सुंदर तापलेल्या ताज्या दुधाचे पेले व प्रत्येकीं २।२ केळीं व थोडे शंकरपाळे दिले.

मुलांचें एवढे खाणें होईतों आजोबानी आंत जन्याला घरची सारी माहीती विचारली, व मग साऱ्या मुलांची ओळख करून घेतली. त्यांच्याशीं जरा विनोदानें बोलून ते घरांत गेले. १० मि. नीं बाहेर येऊन जनूला आपली सारी बाग दाखवण्यास सांगितलें. सारे पायांत चपला घालून जनूबरोबर निघाले.

जनूनें त्यांना प्रथम सर्वांत मोठा उसांचा मळा दाखवला, त्यांत कसे ऊस आहेत, कोणाचा रस फार गोड, त्यांत किती साखर असते, त्याला वाढायला किती दिवस लागतात, जमीन आधी कशी

तयार करायची हें सारे अगदीं संगतवार सांगितलें. त्यानंतर ते मध्यें थोडे इतर भाजीपाल्याचे वावर टाकून मुसुंब्याच्या वावराकडे वळले. तेथें सुद्धां जनूनें हीं कोणत्या प्रकारचीं, पातळ साल कशी ओळखायची, जास्त चवदार कोणतीं असतात, उत्तम मोसुंबं कसं असतं तें तोडून दाखवलं, पिकलेलं कसं ओळखावं, तें चांगल कां वाईट, हें ही नीट अगदी वाक्बगार माळ्याप्रमाणें सांगितलें, व प्रत्येकाला तेथें खायला २।२, ३।३ सुन्दर सुन्दर मोसंबी हरबास देण्यास सांगितलीं.

त्या नंतर ते मोटांपाशीं आले; जनू खेरीज प्रत्येकाला मोटेची फार मजा वाटली. तें परटाच्या कपड्या प्रमाणें पांढरें स्वच्छ पाणी, तें लहान मुलाप्रमाणें दुडुदुडु धावणारें स्वच्छ पाणी व त्या मोटवाल्याचें गोड मंजूळ आवाजातलें गाणें ऐकून त्यांना फार मजा वाटली.

नंतर त्यांचा तेथें पोहण्याचा बेत झाला; सारे आजोबाच्या देखरेखीखालीं बराच वेळ तेथें पोहले. त्यांना खूप मजा नि व्यायाम मिळाला. या नंतर जेव्हां ते बाहेर आले तेव्हां त्यांना अगदी सडकून भूक लागली.

घरांत जाऊन प्रत्येकानें आपआपली शिदोरी बाहेर काढली. पण आजोबा नि आजी येत असल्यानें ते जरा थांबले.

आजी नि आजोबा आल्यावर रामा गड्यानें आणलेल्या १०।१२ सुन्दरशा पत्रावळी बन्यानें मांडल्या. आजी, जन्या नि लंब्या यांनीं वाढावयास सुरवात केली.

इतक्यांत हरबानें एक मोठीशी सुन्दर दह्याची बरणी, एक कोळ्याच्या पोह्यांचे पातेले व वांग्याचे भरीत आणून मध्यभागीं ठेवले.

झालें. या त्रिकुटांचें वाढप संपलें. शंब्या, लंब्या, जन्या, मन्या, रंग्या चटू सारे बसले. जवळच आजोबा, आजी, थोड्या अंतरावर

रामा, हरबा व त्याचा गोविंदा नांवाचा एक मुलगा बसला. सारे एकमेकांतला दुजाभाव विसरून गप्पा मारीत होते.

आजोबा नि आजी मधून मधून गमतीदार मागच्या आठवणी सांगत होते. हरबा नि रामा....आपण पूर्वी असे याच बागेंत केव्हां जेवलों, मंडळी कोण कोण होती, त्यांनीं आम्हाला अगदीं परकं है लेखतां कसं आपल्यांतलेच मानून चांगलं वागवलं. त्यांनीं पुण्याहून काय काय गम्मत आणली होती तें मोठ्या प्रेमानें सांगितलें. शेवटीं प्रत्येकानें एकादा श्लोक वा गाणें म्हणून जेवण संपविलें.

जेवणानंतर मैदानी खेळांत कधींही मोठा भाग खेळ येत असूनही न घेणारे जगन्नाथराव आपल्या पोतडींतून पत्त्याचा डाव काढते झाले.

या डावांत पुराण मतवादी आजोबासुद्धां सामील झाले. रामा... हरबा चांगले बुद्धीमान नि कामसू गडी तेही सामील झाले.

सारे मजेंत खेळत होते, आजोबा त्यांना येत असलेले नवे नवे डाव शिकवीत होते. रघ्या, सद्या आपणांस येत असलेले जादूचे प्रयोग इतरांना दाखवीत होते. आजी आपल्या नुसत्या गम्मत पहात होत्या. मधेंच त्यांनीं छानदार गुलाबी पेरूच्या फोडी त्या सर्वांना आणून दिल्या. पहा किती रसिक नि गोड आजी त्या.

यानंतर चाराचे सुमारास ही मंडळी पुन्हां बागेंत हिंडायला गेली.

आतां मोटा सुरू होण्याच्या बेतांत होत्या. इतक्यांत हे आठजण मोटेपाशीं आले व हरबाला म्हणाले ' हरबा आम्हाला येईल कां ही मोट वर काढतां. ' हरबांनीं 'हो' म्हणतांच त्यांनीं रामाला बैल बाजूस करावयास सांगून मोटेस हात घातला. हळूं हळूं मोट खालीं गेली. या आठ मुलांनीं वर ती अगदीं हां हां म्हणतां काढली. तेव्हां सर्वांना आनंद नि अभिमान वाटला.

त्यानंतर ते मुसुंब्याच्या भागाकडे वळले. तेथें २ पुरुष व १ बाई मुसुंबीं तोडीत होत्या. या सर्वांनीं तीं कशीं काढताहेत हें नीट पाहून त्यांच्या परवानगीनें आपणही हुबेहूब तशींच मोसंबीं काढण्यास सुरुवात केली. त्यांचे तें सुन्दर नि सहज निरीक्षण पाहून त्या खेडूत कामगारांना फार कौतुक वाटलें, त्यांची ती हौस, चातुर्य नि कामाची आवड पाहूनही त्यांना त्यांच्याबद्दल प्रेम उत्पन्न झालें.

याच्यापुढें ते उसाकडे गेले. जनूनें आपल्याला वाटतील ते उत्तम उत्तम डांगे एकेकाला दिले. व ते सारे बांधावर ऊस खात बसले.

इतक्यांत त्यांचेवर बारीक खड्यांचा मारा झाला. सारे एकदम आपलें खाणें थांबवून सगळीकडे पाहूं लागले.

थोड्या अंतरावर २।३ मुलें अगदीं बाजूला असलेल्या आंब्याच्या कैऱ्या पाडीत असून २ मुलें दबा धरून यांचेवर दगड फेकीत होतीं. जन्यानें त्यांच्याकडे पाहिलें तों त्यास त्याचे मागचे शत्रु ते हेच असें आढळून आलें. त्याबरोबर त्याला फारच राग आला.

तो म्हणाला 'अरे आमच्या झाडाचे आंबे आम्हाला नाहीं ? थांबा' असें म्हणून तो जोरांत त्यांचेवर धावला; पण त्याचे आधींच आमचा जन्या नि सद्या यांनीं त्या दोघांना पकडून लढ्ढालढ्ढीस सुरवात केली होती.

जन्याच्या मागून बाकीचे सारे धावले पण आमचे लंबोदरपंत आपले जागेवरच. पण त्यानें 'बजरंग बाबा' 'बाबा' असें दोनदां म्हटलें त्याबरोबर त्याचेपुढें एक तेजःपुंज पुरुष उभा राहिला. शंड्यानें त्याला थोडक्यांत सारें समजावून दिलें. त्यानें त्या मुलांना तेथेच अडकण्याचा हुकूम केला.

बराच वेळ त्या तिघांना हलतां कां बोलतां येईना. पण

खालच्या दोघांनीं आपली शरणागती दाखवल्यावर शंब्यानें त्यांना मोकळें केलें.

सुमारे ५। वाजण्याचे सुमारास साऱ्यांनीं बांधाबांध करून जायची तयारी केली. त्यांनीं बरोबर एक एक थंडा उसाचा, हरबरा, ४।४ ५।५ मुसुंबीं व पुष्कळशा कैऱ्या घेतल्या होत्या.

५॥ चे सुमारास ते कोथरूडहून निघाले व रमत गमत ७ चे सुमारास अंधार पडायचे बेताला ते घरीं आले.

सारे नवीन वर्ग सुरू होऊन ४।५ महिने झाले होते. २।४ दिवसांपूर्वी सहामाही परीक्षा संपून गॅदरिंगला आजपासून आरंभ होणार होता.

पुष्कळ वर्गांनीं आपापले निरनिराळे सुन्दर कार्यक्रम आखून बरेच दिवस त्याची कसून तयारी चालविली होती.

आज आपल्या ढब्बे मास्तरांच्या आवडत्या शंब्या कंपूच्या वर्गाचें नाटक होणार होतें. परंतु मधेंच आजचें नाटक उद्यावर ढकलण्याची सूचना हेडमास्तरांकडून वर्गांत फिरली. पण कोणालाही त्याबद्दल वाईट वाटलें नाहीं.

त्याचें कारणही तसेंच होतें. आज गावांत नविनच आलेली प्रो. मोरे यांची सर्कस पहावयास साऱ्या शाळांतून मुलें जाणार होतीं सर्कशीला त्या दिवशीं येणारें जास्तींत जास्त उत्पन्न ती सर्कस आझाद हिंद सेनेला देणार होती.

त्या काळांत आझाद हिंद सेनेचें. नांव सर्वतोमुखीं झालें होतें, त्या सेनेंतील एकादा जरि शिपाई कुणाला भेटला तर सारे लोक त्याचा आदरसत्कार करीत.

ते होतेच तसे गुणी. एवढ्या मोठ्या इंग्रज सरकारशीं मुठभर

लोकांनी लढणें सोपें नव्हतें. पण तें अवघड काम त्या लोकांनी नेटानें करून दाखविलें त्यांत त्यांना अपयश आलें दुर्दैव आपलें !

थोडेच दिवसांपूर्वी साऱ्या आझाद सैनिकांवर खटले भरवून थोडया फार शिक्षा करून सोडून दिले होते. आतां त्यांना काम मिळे पर्यंत नि त्यांचे सारें सुरळीत होई पर्यंत त्यांना कांहीं मदत करणें अवश्य होतें व तें काम जनसमुदायानें आपल्यावर घेतलें होतें. लोकांनीं केलेली मदत कांहींच्या बायकामुलांच्या मदतीस जाई, कांहीं खुद्द त्या सैनिकांस जाई, कांहीं परगावीं असलेल्यांच्या करतां चांगल्या वस्तु खरेदी करण्याकरतां जाई.

ती मदत लोक स्वतःची काटकसर करून देत तर कोणी आपल्या दुकानांतून फायद्यांतले पैसे देत, कोणी १।२ दिवस आपला धंदा त्यांच्या करतां चालवून आलेला पैसा एकदम बहाल करीत, कोणी कोणी बडे लोक पेट्या हिंडवूनही त्यांना मदत मिळवून देत.

आज त्याच प्रकारानें ही सर्कस पहिला खेळ आझाद सेनेकरतां करणार होती. आज प्रत्येक शाळेकडून कोण किती जास्त तिकिटें खपवितो याची चढाओढ लागली होती.

ती पहा आमच्या ' हिंद महाविद्यालयाचीं ' मुलें एक एक भारी भारी किंमतिचीं तिकीटें घेत होती. आजचे त्यांचे पैसे...स्वतःचे खाऊचे श्रमाचे होते. बहुतेक मुलांनी २॥ रु. चीं तिकीटें घेतलीं असून मास्तरांनी ३॥ ते ४ रु. चीं तिकिटें घेतलीं होतीं.

साध्या भिकाऱ्याला एक पैसा द्यावयाला काकूं करतील, स्वतःला कपडे जाडे भरडे वापरतील, शक्यतों काटकसरीची कमाल करतील, पण तेच आज ३॥ रु. चें तिकीट घेत आहेत. केवढा हा मुलांपासून शिक्षकांपर्यंतचा उच्च त्याग ! काय हें देशबंधूप्रेम ? खरोखर कमालच !!!

५॥ चे सुमारास बँडला सुरुवात झाली. लोक हळू हळू जमूं लागले. दरवाज्यावरील माणसें ज्याच्या त्याच्या जागा दाखवूं लागले. आज साऱ्या जागा भरल्या होत्या. एवढालीं लहान लहान पोरें भारी जागेवर पाहून सर्वांना आश्चर्य वाटलें. कुणी त्यांना चैनी पोरें म्हटलें, कुणी त्यांना लबाड ठरवलें. पण तीं खरीं त्यागीं बालकें होतीं. हें त्यांना कसें कळणार ?

बँड एकदम थांबला. पटांगणांत एकदम ४।५ निरनिराळ्या रंगीत कपड्यांचे शिपाई आले. त्यांनीं लोकांना प्रणाम करून कांहीं नवीन खेळाची तयारी केली; चिनी मुलांचे तोल संभाळणें, एका बाईनें पिंपांतील मुलीला सुरे मारिले, परंतु तिनें त्यांतसुद्धां कपडे बदलून दाखविले. बाजूला असलेल्या लोखंडी गजांना जोडून भरभर पिंजरा रचावयास सुरुवात झाली. लोकांना आतां कोणाचें काम होणार हें बहिरंगामुळें कळून आलें. ५।१० मिनिटांत एक मोठा पिंजरा येतांना लोकांना दिसला.

आतां जरा आंत पाहूं. आंत एक मोठें वर्तुळाकार पाण्याचें ठेंगणें पिंप ठेवलें असून त्याच्या डाव्या उजव्या बाजूला उंचच्या उंच दोन स्टुलें उभीं असून त्यांच्यावर मोटेची सारी तयारी ठेवली होती. ५ मिनिटांच्या आंत दोन पट्टेदार वाघ गुरगुरत प्रवेशिले. त्यांचे पाठोपाठ एक हिरव्या पोषाखाचा दिसायला चपळ मनुष्य आला; त्यानें झट्कन त्या वाघांना मोटेला जोडले.

मोट मागें मागें जाऊं लागली, ती खालीं गेली, लोकांनी एकवट टाळ्यांचा गडगडाट केला. मोट अगदी मंदगतीनें बाहेर येऊं लागली, लोक अगदी उत्सुकतेनें त्यांकडे पाहूं लागले.

थोड्याच वेळांत मोट नीटपणें वर आली. वाघ अगदीं बैला प्रमाणें काम करतांना पाहून लोक आश्चर्यचकित झाले.

या नंतर दोन माणसांचें झोपाळ्याचें काम झालें तें अगदी चापल्याचें नि कौशल्ययुक्त झालें. मग आलें काम एक चाकी सायकलचें; इतका वेळ दडी मारून बसलेले विदूषक वीर एका दुचाकीवरून शीळ घालीत आले व लोकांना आपल्या कृतीनें हंसवूं लागले. त्यानें सायकलवर बसणाऱ्याचे पाठींतच फळकूट मारून फट्ट फट्ट आवाज करावा, आपली बॅट इकडे तिकडे फिरवून मुलांना हंसवावें, मधेंच एकदां आंतल्या मुलींच्या डोक्यांत टोपी घालावी असे प्रकार सुरू केले. सारे एकचाकी सायकल स्वार तय्यार झाले व आपल्या लीला दाखवूं लागले; त्यांनी, एकदा रांगच केली, कडें केले. त्यांत सुद्धां आमचे विदूषक महाशय धडपडायला गेलेच. त्यांनी आपली पलीकडची एकचाकी घेऊन त्यांच्या कड्यांतून वाकडे तिकडे जाऊन दाखविल, रांगेतून त्यांच्या हाताखालूनच जा....ही कामें हसंत हसंत करून दाखविलीं.

या नंतर घोड्यांचें कलापूर्ण काम झालें; एका घोड्यानें त्याच्यावरच्या माणसानें त्याला दाखवून ठेवलेली वस्तू अगदीं अचूक ओळखून दाखविली. एका माणसानें तर घोडा धावत असतांना सर्व कपडे घालून, काढून दाखविले.

या नंतर मधली सुट्टी झाली. बॅन्ड परत वाजूं लागला.

५ ते १० मि. मध्यंतर संपून सर्कसला सुरवात झाली. इतक्यांत अंगात रंगी बेरंगी कपडे घातले आहेत, अंगानें खूप जाडा जुडा असलेला एक पेहेलवानी पेशाचा मनुष्य डुलत, डुलत आला. त्यानें सर्व लोकांना नमन करून आपले दंड १।२ दा थोपटले. व बोलूं लागला.

"मी या सर्कशींत आज बरींच वर्षे असून मी एका वेळीं ४।४।५।५ माणसें उचलतों. आज जर माझ्यापेक्षां कितीही मोठा जाडा असा

माणूस आला तरी मी त्या माणसाला उचलून दाखवीन. जर मी त्याला उचललें नाहीं तर मी २००० रु. बक्षीस देईन. बोला कोण आहे तैय्यार "बोला." त्यानें दंड थोपटून आव्हान दिलें.

"मी मी तयार आहें. येऊं काय ?" मुलांच्या घोळक्यांतून एक आवाज आला.

आपल्या २॥ रु. दराच्या घोळक्यांतून शंभूराव गर्जले होते. त्यानें बजरंग बाबाचें चिंतन केलें व त्याला म्हणाला जाऊं का ?

असें तो म्हणतो न म्हणतो तोंच बजरंग बाबा त्याच्या मागें हजर. ते म्हणाले 'तू सारखं राम राम म्हण....आणि मिळणारे पैसे दान कर. जा विजयी हो.'

सारे लोक या मुलाकडे टकमका पाहूं लागले व बंडोपंतांची बाहेर पडणारी स्वारी दिसतांच सारीं मुलें नि लोक खद्खदा हसूं लागले.

लोक म्हणाले काय खुळचट पोर आहे. जो पेहेलवान ४।५ माणसं उचलतो, मोठ्ठा वृक्ष हलवतो तो या चिमुरड्याला उचलणार नाहीं ? अगदींच बुवा ! उगीच फजीती घेईल करून.

पण आमचा शंभ्या कुणाला दाद देतोय ! तो आपला गर्दी चुकवीत चुकवीत गेला पुढें. आणि दंड थोपटून राहिला त्या पेहेलवानासमोर उभा.

तो पेहेलवान गर्वांत हंसला आणि शंभ्याला उचलण्याकरतां एकाच हातानें प्रयत्न करूं लागला. पण आमच्या शंभ्याच्या राम-नामापुढें त्याचा जोर फिका पडला. एका हातानें नाहीं तर दोन्ही हातांनीं तो अगदीं दांत ओठ खावून त्याला उचलूं लागला. पण छेः तो कसला हलतो. त्याला दुसऱ्या मुद्दाम स्वच्छ केलेल्या जागीं उभा केला. पण नाहीं. तो पेहेलवान अगदीं रडकुंडीस आला. त्यानें

देवाचं धर्माचं नांव घेऊन परत प्रयत्न केला. पण छे! शंब्याच्या पांयांखालची धूळसुद्धां हलली नाहीं. सर्व तंबूंत हाहाकार उडाला. प्रो. मोर नजीकच उभे होते हा प्रकार पहात. कारण त्यांना वाटलें खेळाला रंग चढण्यासाठीं आपला पेहेलवान गम्मतच करीत आहे. मोरनाच काय परंतु तंबूतील साऱ्या प्रेक्षकांना तसेंच वाटलें. परंतु वळीवाच्या पावसाचें पाणी नि खरी वस्तुस्थिति फार वेळ लपून राहूं शकत नाहीं. मोर वस्तुस्थितीचें आकलन झाल्यावर खेळाडूपाशीं गेले. आणि त्याच्या कानांत कांहीं तरी कुजबुजेल.

शंब्याकडे सर्व प्रेक्षकवर्ग कुतुहलपणें पहात होता. त्याच्या शाळेंतील मुलें तर त्याचा जयजयकार देखील करूं लागलीं होतीं. शंब्याला पुन्हा वेगळ्या जागीं उभें करून पेहेलवानानें फिरून प्रयत्न केला, पण येरे माझ्या मागल्या. पहिलवान दांत ओंठ खाऊन शंब्याच्या कमरे भोंवती आपल्या हाताचा विळखा घालून उचलूं पाही पण शंब्याचे पाय जमीनिपासून एक इंच वर उचलले गेले तर शपथ. प्रो. मोर नि इतर कांहीं प्रमुख मंडळी बकप 'सँडो', 'वारे पेहेलवान' 'बहोत होशियार,' 'चलो हं' अशा शब्दांनी उत्तेजन देत होते. त्यांच्या उत्तेजनपर शब्दानें आधीच इरेला पडलेला तो सॅन्डो पुन्हा आपलें शक्तिसर्वस्व पणाला लावून उचलूं पाहूं लागला. परंतु सर्व प्रयत्न निष्फळ ठरले, शेवटीं नाइलाजास्तव जाहीर केलेले २००० रु. शंब्याच्या स्वाधीन केले गेले आणि शेवटीं मोरनीं व्याख्यान दिलें.

ते म्हणाले "मी आज २० वर्षें अशा प्रकारचे खेळ करीत आलों. पण असा शूर जोडीदार आम्हाला भेटला नव्हता. तो लहान असून आमच्या कसलेल्या माणसाला भारी झाला. आज त्याच्या या पराक्रमाबद्दल मी त्याला २००० रु. देतों. मला खात्री आहे कीं तो ते आझाद हिंद फौजेलाच देईल."

अवश्य अवश्य एक बारीक आवाज आला. त्यानें एका हातानें शंब्याला पैसे घेतले व दुसऱ्या हातानें परत दिले.

त्याच्या त्या औदार्या बद्दल लोकांनी त्याचें टाळ्यांनीं अभिनंदन केलें.

या नंतर आणखी २–४ खेळ होऊन सर्कसचा खेळ सुटला.

ज्याच्या त्याच्या तोंडी शंब्याच्या शौर्याचं वर्णन सुरू होतं. आज एवढी शाळेकडे गर्दी कां ! याचें कारण शंब्या लंब्या !

आज दुपारीं ४ वाजतां शंब्याच्या सर्कशींतील पराक्रमाबद्दल अभिनंदनपर सभा होती.

बरोबर ४॥ ला समारंभास सुरवात झाली. प्रत्येक मास्तरानीं त्याचें वर्णन केलें. ते जो जो आनंद व्यक्त करीत तों तों ढब्बे मास्तर आणि शंब्या कंपू यांना अगदी आनंदोर्मि येत होत्या. अखेर जेव्हां शंब्याला हार घालण्यांत आला तेव्हां सर्व भान विसरून ते अगदीं ब्रह्मानंदांत मग्न झाले. हार घातल्यानंतर कांहींतरी चार शब्द बोललेंच पाहिजे म्हणून त्यानें सुरवात केली. " हें जे माझें अभिनंदन झालें त्याला सर्वस्वी कारणीभूत मी नसून...ज्याप्रमाणें शिवाजीला भवानीची मदत तशी मला माझ्या बजरंगबावांची मदत. तुम्ही माझें जें एवढें अभिनंदन केलंत त्याबद्दल मी आपल्या सर्वांचा अभारी आहे." टाळ्यांच्या 'कडऽऽ कडऽऽ' च्या गर्जनेंत शंबूराव खालीं बसले.

"कायरे तुझे हे बजरंगबाबारे कोण ? आणि त्यांनीं रे तुला कशी मदत केली" वर्गांत गेल्यावर ढब्बे मास्तर नि इतर मुलें त्याला विचारूं लागलीं. शंब्यानें एकेकाला सावकाशपणें सर्व वृत्तांत सांगितल्यावर सर्वजण आश्चर्य आनंद नि अभिमानाच्या भावनेनें घरीं गेले.

दिवाळी ५।६ दिवसांवर आली होती. शंब्या नि बन्या कंपू अगदी जातीनें माती मिळवणें, जागा संशोधन करणें, चित्रांची जमवा-जमव करणें, व कोणत्या प्रकारचा किल्ला करणें याची अगदी कसून तयारी करीत होते.

आज सारें सामान तयार होऊन किल्ल्याच्या बांधकामास सुरवात झाली होती.

जग्यानें आपल्याकडच्या विटांचे तुकडे नि कामट्या आणल्या.

जन्यानें थोडेसे शिपाई, रंगपेटी, चुना आणला. मन्यानें पुष्कळसे निरनिराळ्या रंगाचें नि आकाराचें दगड आणले. अशा तऱ्हेनें जमवा-जमव झाल्यावर जन्याकडील माती नि जग्याकडील विटा यांच्या सहाय्यानें भरभर काम चालू झालें.

आज किल्ल्याचा बाहेरचा तट पूर्ण झाला होता व आंतल्या किल्ल्याच्या प्लानची चर्चा सुरू होती,

किल्ल्याचा घेर ७ ते ८ फूट लांब आणि ५ फूट रुंद होता.

बऱ्याच वेळानंतर आंतल्या कामास सुरवात झाली. प्रथम एक उंच जागा करून तीवर लहानसा बालेकिल्ला बांधला व मग आंत मोठा भाग तयार होऊं लागला. किल्ल्यांत अगदीं सुंदर रचना केल्या होत्या. कांहीं अंतरावर १।२, १।२ चौक्या, मधें मधें झरोके केले. मधें १।२ विहिरी केल्या होत्या.

किल्ल्याचें बांधकाम अगदीं चुनेगच्ची झालें होतें.

किल्ला वाळण्यास थोडा अवधि होता तोंपर्यंत सर्वानुमतें, आंत चित्रमांडणी कशी करावयाची याची चर्चा झाली व प्रत्येकानें सुच-वलेल्या पैकीं शक्य त्या सूचना घेतल्या. आतां किल्ला चांगला वाळला होता. किल्ल्याबाहेर ५।६ इंचांचा लहानसा खंदक तयार केला होता.

आतां आपण खुद्द किल्ल्यांतच जाऊं. कारण परवा आहे दिवाळी. तेव्हां यांचा किल्ला अगदीं पूर्ण तयार होत आलाच आहे तो कसा दिसतो हें चित्रें ठेवून आज ते पहाणार होते. आणि तेवढ्यांतच सकाळी त्यांना त्यांच्या ओळखीच्या गृहस्थानें अशी बातमी दिली:— ज्यांचा किल्ला जुन्या बांधणीचा व अगदीं कलापूर्ण होईल त्याला भारत मंडळ ५० रु. बक्षिस व सुवर्ण पदक देईल.

या बातमीनें त्यांनी अगदीं आपलें काम जोरांत चालवलें होतें. पण या कामीं त्यांनी एक चूक केली. ज्याप्रमाणें लेखक आपली कच्ची गोष्ट एकदम सर्वांना दाखवीत नाहीं व मासिकाकडून दाखवितो तसें यांनी आपलें काम गुप्त ठेवावयास पाहिजे होतें पण.....

'कायरे या बुरुजावर कशीरे चौकी बसवणार?' 'आणि या इथें राजवाडा ठेवणार कीं काय?'

अशा एक ना १० शंकांवर शंका काढून हन्या....बग्या....शंठ्या कंपूला विचारीत असत व तेही कांहीं मनांत न आणतां मोकळे पणानें सांगत. पण याचा परिणाम एकदा जन्यानें स्वतःच पाहून सांगितलेल्या बातमीनें कळून आला. परंतु आतां काय उपयोग होता? यांचा नि त्यांचा, दोघांचेही किल्ले पूर्ण तय्यार झाले होते.

ही सारी दुष्ट कृति करणारे यांचे पलिकडच्या आळींतील लोक होते.

उद्यां तर प्रदर्शनांतले परीक्षक किल्ला पहावयास येणार असें कळलें होतें!

शंठ्या लंब्याचे जीव अगदीं खालींवर होत होते. आपण इतके कष्ट करून फुकटच्या फुकट बक्षिस मात्र दुसरेच पटकवणार याचे त्यांना फार वाईट वाटलें. पण ते बजरंग बाबाच्या कृपेनें निवारलें.

आज रात्रीं किल्ला बघितला जाणार. आतां काय होतं नि काय नाहीं याकडे त्यांचे डोळे लागले होते.

मुलांचीं जेवणं झाल्यावर ते अगदीं किल्ल्याच्या सजावटीकडे लागले. पण किती केलं तरी शेवट काय होणार हें त्यांना कळतच होतं.

रात्रीचे १०॥ चे सुमारास परीक्षक आले. त्यांनी यांचा लाल किल्ला पाहिला. व आपल्या वहींत कांहीं तरी लिहीलें.

सारीं मुलें झोपलीं होतीं. किल्ला बजरंग बाबानेंच दाखविला होता. पण परीक्षकाच्या वहींत ५५।१०० मार्क यांच्या किल्ल्याला मिळाले होते.

आमच्या बजरंग बाबानें शेजाऱ्याच्या किल्ल्यावर लाल किल्ला व यांच्यावर बॉम्बे फोर्ट अशा विचित्र पाट्या लटकवल्या होत्या. ५५ मार्क मिळाले 'फोर्टला' व ७६।१०० मिळाले 'लालला.'

आज बक्षिस समारंभ होणार होता. गांवांतील ५।६ किल्लेकरांच्या टोळ्या व इतर प्रदर्शनप्रिय माणसें समारंभास हजर होतीं. लाल किल्ला ७६ मार्कस्...पहिलें बक्षिस, देवगड किल्ला २ रा क्रमांक ६० मार्कस्; बॅांबे फोर्ट ५५ मार्क तिसरा क्रमांक ५ रु. ३ रु. २ रु. याप्रमाणें बक्षीस समारंभ झाला. शंब्या कंपूच्या आनंदास पारावारच उरला नाहीं. घरीं आल्यावर त्यांनीं आपल्या किल्ल्याला शाबासकी दिली. जन्या जग्यानें तर १ रु. पेढेच आणले होते.

किल्ला प्रदर्शनाचा आजचा शेवटचाच दिवस होता. आज लाल किल्ला अगदी विजयोन्मादानें ओथंबला होता. त्याच्या वर लावलेल्या मेणबत्या ह्या जणूं पांढऱ्या वायलवर निरनिराळया रंगाच्या रेशमानी काढलेलीं मोहक फुलंच भासत.

किल्ल्याच्याबाहेर एक खंदक केलेला होता त्यांत दोन्ही कांठांना दोन नावा ठेवल्या होत्या. एक नांव प्रवाहांत होती, त्यांत दोन तीन

माणसें बसविलीं होतीं. व दुसऱ्या तिरावर एक पुढें पाय टाकलेला शिपाई उभा करून तो नांवेत चढत आहे असा देखावा होता. किल्ल्याच्या मुख्य दरवाज्यावर दोन संगीनी घेतलेले पहारेकरी होते. आंत जायला दोन तट ओलांडावयास लागत. पहिला तट सुटताच दुसरा तट लागे. दरवाज्यावर दोन आंत व दोन बाहेर शिपाई होते. त्यांच्या निजण्याचा एक तंबू दाखवला असून कागदी पुढच्या दोन तीन चौपाया सुद्धां ठेविल्या होत्या. प्रत्यक्ष आंत बालेकिल्ल्यावर एक सुन्दर आधुनिक राजवाडा ठेवला असून आंत अगदीं लहान लहान सुन्दर दालनें केलीं होतीं, व त्याच्या खिडक्यांना हिरव्या तांबड्या रंगाचे पडदे लावले होते. त्याच्या खालीं दुसरं एक दगडांच्या विटांचं फार भक्कम खोपट केलं असून त्यांत दोन दालनें होतीं, त्यांत २।२ पांढऱ्या टोपीचे दिसायला साधे पण वृत्तीनें जहाल भासणारे लोक होते. त्याच्या बाहेर एक चौकी होती तींत दोन शिपाई होते. थोड्या अंतरावर एका मुद्दाम केलेल्या उंच जागीं एक मोठं, खोपटं, व मळा दाखवला होता. किल्ल्यांत दोन विहिरी होत्या इतर ठिकाणीं अशींच लहान लहान चित्रें, विमानतळ, फांस, सैन्याचीं पथकं, त्यांच्या माऱ्याच्या जागा, तंबू, कागदाच्या खाकी मोटारी, तोफा... बुरुजावर कांहीं तोफा ठेविल्या होत्या. मुख्य दरवाज्यावरील बुरुजावर एक तिरंगी निशाण फडकत होतं

नुकतीच निवडणुकीची धामधूम सुरू होती. कॉंग्रेसच्या उमेदवारांचीं नांवें आज रस्तो रस्तीं फडकत होतीं. सुट्टी अजून १४।१५ दिवस उरली होती.

या कंपूला आधींच आवड असल्यानें त्यांनी सेवादलांत जाण्याचें सुरू केलं होतं.

दलांत ते हुतूतु, खोखो हे खेळ तर खेळतच पण दर गुरवारीं नि शनिवारी बौद्धिक वर्गही ऐकत. ते आपल्या आधींच्या प्रसिद्धीनें लोकप्रिय झाले होते.

एका गुरुवारच्या बौद्धिकांत त्यांच्या गट प्रमुखानें सांगितलें या निवडणूक प्रचारासाठीं आपल्याला जावयाचें आहे. ८।१० मुलें पाहिजेत तीं कष्टांना न डरणारीं, शूर नि कार्यक्षम असावीं. आपल्याला सर्व गावांतून प्रचार करावयाचा आहे ८।१० दिवस रहाणें पडेल.

त्याच्या तोंडून पुढचे शब्द यावयाचे आंत शंभ्या कंपू एकदम आठ कोपऱ्यांनी उभा राहिला व आपलीं नांवे प्रथम घेण्यास विनविलें.

वर्गप्रमुखानें त्यांना सगळ्या अडचणी नीटपणें समजाऊन दिल्या व पालकांची परवानगी आणण्यास सांगितले. ६॥। ला दल सुटलें. सर्व मुलें बाहेर गेल्यावर त्यांनी मुद्दाम पुन्हा शिक्षकांची भेट घेतली व आपल्या खाजगी शंकांचे निरसन केलें

आज मुलांना घरीं यायला जरा उशीरच झाला होता. ७—७। होऊन गेले होते. आजी दाराबाहेरच शंभ्या लंब्याशीं वाट पहात होत्या.

बऱ्याच वेळानंतर ते दोघे घरीं आले. आजीनें कारण विचारतां बऱ्याच प्रशस्ति नंतर आपलं सांगणं त्यांनी संपवलं. आजींना एवढ्या लांब चऱ्हाटाचा कंटाळा आला होता, आणि खरं पाहिलं तर त्यांना याच्या मागें काय आहे तें कळेचना. शंभ्यालाही आपण उघड विचारल्या शिवाय कांहीं जमणार नाहीं हें समजल्यावर त्यांनी उघड प्रश्न केला " आजी आम्ही ७।८ दिवसाच्या सहलीला दलामार्फत जाऊं कां ? "

यावर आजींनी बरेच प्रश्न उप-प्रश्न विचारून त्यांना जाण्याची परवानगी देऊनच तो प्रश्न निकालांत काढला.

झालें मुलांच्या आनंदास पारावारच उरला नाहीं. सकाळीं उठतांच ते अगदीं उड्या मारीत मारीत आपल्या मित्रांच्या चौकशीसाठीं बाहेर पडले.

ज्या कोणाला परवानगीच मिळाली नव्हती त्यांच्या मातापित-रांच्या या इतरांनी केलेल्या मनधरणीनं त्यांनीं त्यांना जाण्याची पर-वानगी दिली.

अशा तऱ्हेनें सर्वांना परवानग्या मिळाल्यावर त्यांनी आपल्या मंडळ-प्रमुखासह जाण्याचा विचार पक्का केला.

गुरुवारीं सकाळीं ६॥। वाजतां हीं ८।१० व इतर ५।६ मुलें मिळून १९।२० जण हळूं हळूं मार्गाला लागले. पहिला मुक्काम त्यांनीं खड-कीला केला. तेथें गावांत जाऊन त्यांनीं प्रथम एका देवळांत मुक्काम ठेविला. १०॥चे सुमारास त्यांनी बरोबर घेतलेल्या शिध्याचा भांड्यांच्या साहाय्यानें स्वयंपाक केला व ११ ला भोजन करून सर्वजण आपल्या पथाऱ्या पसरून जरासे पडले. तोंवर त्यांच्या प्रमुखानें पाटलांच्या घरीं जाऊन आपला येण्याचा उद्देश सांगितला. पाटलांनी लगेच सभा घेण्यास परवानगी दिली. २ च्या सुमारास अगोदर दिलेल्या दंव-डीच्या साह्यानें सारे लोक देवळांत जमले. मध्यभागीं पाटील बाबा बसले. एका कठड्याला राष्ट्रध्वज लावून रघुनाथनें स्वागतपर पद्य म्हटलें. लोकांना तें फारच आवडले. त्यानंतर श्रीकांत व यशवंत या दल-शिक्षकांनी निवडणूकीची समग्र माहिती दिली. आपले उमेदवार कोण व ते कसे चांगले आहेत, त्यांनाच आपण मतें दिल्यानें काय होणार व तेच निवडून आणल्यानें आपला काय फायदा होणार आहे वगैरे सर्व माहिती त्यांनीं दिली.

अशा तऱ्हेनें कुठें या गावीं १ दिवस कुठें दुसऱ्या गावीं २ दिवस असें करीत करीत निघाल्यापासून १० दिवसांनी ते परत

पुण्यपतनास आले. या प्रवासांत त्यांनी एक....दोन गोष्टी केल्या. त्या फारच चांगल्या होत्या. प्रथम जेंव्हां ते पुण्याहून खडकी पर्यंत गेले तेंव्हां वाटेंत एका भाजीवालीला मिलिटरी मोटारचा धक्का लागल्यानें तीची सर्व भाजी विसकटली, तिच्या गुडघ्याला नि डोक्याला चांगल्याच जखमा झाल्या; त्यांनी त्या बाईला त्या मिलिटरीच्या मोटारींत बसवून खडकीच्या दवाखान्यांत नेलं व तिला प्रथमोपचार करून परत त्याच मोटारनें घरीं पोंहोचवलं व तिला २।३ रु. स्वतःचे खिशातले खर्चाला दिले.

दुसरं असंच एकदा ते देहू या गावठाणास गेले असतां २ च्या सुमारास एक १३।१४ वर्षांची मुलगी नदींत पडली. हे त्या वेळीं एका देवळांत जेवण करीत होते तें. देऊळ अगदीं काठांवरच होतं. त्यांना त्या मुलीचे आक्रांत शब्द ऐकूं आले. दोन्ही मास्तर अगदीं जेवण तसंच टाकून खरकट्या हातांनी प्रवाहाकडे धांवले. दोघांनी बऱ्याच प्रयासानें त्या प्रवाहाच्या वेगाला सांभाळून त्या मुलीला एकदांचं गाठलं व मोठ्या कष्टानें देवळावर आणलं. तिला प्रथमोपचार करून आधी सावध केलें. तोंवर मुलीचे आई वडील आले होते. ते प्रथम घाबरूनच गेले. पण इतर मोठ्या माणसांनी त्या मुलीला मदत करण्यास सांगितलें; पण त्या दोघांना कांहीं सुचेचना, मग त्या मास्तरांनी एका मोठ्या मुलीला त्या साधारण शुद्धीवर आलेल्या मुलीला आपलें धोतर नेसवून आणावयास सांगितलें. त्या समंजस मुलीनें तें काम झट्कन केलें इतक्यांत शंभ्यानें केलेला कोको तिला दिला. यामुळें तर लोकांचा विश्वास यांच्यावर फार बसला.

अशा तऱ्हेनें प्रथम मारामाऱ्या करणारा कंपू पण पुढें किती परोपकारी नि पराक्रमी झाला आहे हें आपण पहातच आहां. मुलांनो तुम्ही मारामाऱ्यांत अवश्य भाग घ्या. पण त्यांत तुमचा खुनशीपणा न दाख-

चतां शौर्य दाखवा. लहानपणच्या भांडखोर नि समंजस वृत्तींनेच तुम्ही तत्त्वनिष्ठ नि कार्यतत्पर नागरिक बनाल. याच करतां आपल्या डोळ्यां पुढें श्रेष्ठ व्यक्ति ठेवून आतांपासून नीट वागण्यास शिका. बोला जय हिंद

---

## वंदेमातरम्

गोष्टीचा शेवट कांहीं हा नव्हे ! शंक्या लंब्या, बजरंगबाबा, यांच्या अशा अनेक गोष्टी मला ठाऊक आहेत कीं ज्या तुम्हास सांगितल्या तर तुम्हाला आपला वेळ केवळ मजेतच गेला असें वाटणार नाहीं. त्या ऐकिल्यानें कांहीं सद्‌गुणांची तुम्हांला नव्याने ओळख पटेल असा माझा विश्वास आहे.

माझ्या लाडक्या चि. प्रमोद, पुष्पा, अरुण, किशोर या चौकडीची ही आवडती शंक्या, जग्या, सद्या बन्या, मन्या,जन्या, रध्या, रंग्या, बाळ गोपाळ मंडळी आज मी तुम्हा सर्वांच्या स्वाधीन करण्यासाठीं 'जनार्दनां'चे हातीं देत आहे. बोला मुलांनो बजरंग बली की जय.

IRBK-0111952